महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

● संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः १८, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार ३० जुलै २०२४ ते सोमवार ५ ऑगस्ट २०२४ ● POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 ● RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## अजित पवारांसह ४१ आमदारांना सुप्रीम कोर्टाची नोटीस; सेना-राष्ट्रवादीच्या सुनावणीबाबत घेतला मोठा निर्णय



**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाची याचिका एकाच दिवशी ऐकू असे म्हणत सर्वोच्च न्यायालयाने अजित पवारांसह त्यांच्यासोबत केलेल्या आमदारांना नोटीस जारी केली आहे. यावर तीन सप्टेंबर रोजी सुनावणी होणार आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या आमदार अपात्रता प्रकरणाच्या निर्णयाविरोधात शरद पवार गटाने सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे.**

■ मुंबई : विशाल कारंडे

अजित पवार यांच्यासह त्यांच्यासोबत गेलेल्या आमदारांना अपात्र करा अशी मागणी जयंत पाटील यांनी केली आहे. या याचिकेविरोधात सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी पार पडली. आजच्या सुनावणीदरम्यान सुप्रीम कोर्टाने शिवसेना आमदार अपात्र प्रकरण आणि राष्ट्रवादीचे आमदार अपात्रता प्रकरण एकाच दिवशी ऐकू असे मुख्य न्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी म्हटले आहे. पुढची सुनावणी एकापाठोपाठ ऐकू असे म्हणत कोर्टाकडून अजित पवार आणि त्यांच्यासह गेलेल्या आमदारांना नोटीसही पाठवली आहे. दरम्यान, याप्रकरणी पुढील सुनावणी ही ३ सप्टेंबर रोजी होणार आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून राष्ट्रवादी तसेच शिवसेना आमदार अपात्रतेची सुनावणी झालेली नाही. त्यामुळे सप्टेंबरमध्ये होणाऱ्या सुनावणीत कोर्ट मोठा निर्णय देणार का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी राहुल नार्वेकर यांच्या समोर झाली त्याचा निर्णय त्यांनी फेब्रुवारी महिन्यात दिला. त्यांच्या वतीने अनिल पाटील हे मुंबई उच्च न्यायालयात गेले. तर शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. आज या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयने नोटीस जारी केली आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

### संक्षिप्त

### खासदारकीला आव्हान, वायकर यांना उच्च न्यायालयाचे समन्स, अमोल कीर्तीकरांच्या आरोपांबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश

■ मुंबई : सम्यक कासारे

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघातून निवडून आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाच्या रवींद्र वायकर यांच्या खासदारकीला उद्धव ठाकरे गटाच्या अमोल कीर्तीकर यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या याचिकेची उच्च न्यायालयाने सोमवारी दखल घेतली आणि वायकर यांच्यासह अन्य उमेदवार व



प्रतिवाद्यांना समन्स बजावून २ सप्टेंबरपर्यंत कीर्तीकर यांनी केलेल्या आरोपांबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. वायकर यांची खासदारकी रद्द करण्याची आणि या मतदारसंघातून आपल्याला निर्वाचित उमेदवार घोषित करण्याची मागणी कीर्तीकर यांनी याचिकेद्वारे केली आहे. कीर्तीकर यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या एकलपीठासमोर सोमवारी सुनावणी झाली. त्यावेळी, न्यायालयाने उपरोक्त आदेश दिले. दरम्यान, मतमोजणीच्या दिवशीच मतांमध्ये तफावत आढळून आल्याने पुन्हा मतमोजणीसाठी अर्ज दाखल केला होता. मात्र, मतमोजणी प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियुक्त केलेल्या निवडणूक अधिकाऱ्यांकडून अनेक गंभीर त्रुटी राहिल्या.

### 'देवेंद्र फडणवीसांमध्ये दम असेल तर...', नाना पटोले यांचं खुलं आव्हान

■ मुंबई : गणेश बागडे

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यामध्ये सध्या आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु आहे. अनिल देशमुख यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर खोटं प्रतिज्ञापत्र देण्यासाठी दबाव टाकल्याचा आरोप केला आहे. तर देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याकडे अनिल देशमुख यांच्या रेकॉर्डिंग असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये दावे-प्रतिदावे केले जात आहेत. यातच आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खुलं आव्हान दिलं आहे. 'देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये दम असेल तर अनिल देशमुख प्रकरणात पुरावे द्यावेत', असं नाना पटोले यांनी म्हटलं आहे.

'आपण पाहिलं की देवेंद्र फडणवीस यांनी दोन दिवसांपूर्वी अनिल देशमुख यांच्यासंदर्भात बोलताना त्यांच्याकडे रेकॉर्डिंग असल्याचं म्हटलं होतं. त्यावर आम्ही आमची भूमिकाही मांडली होती. देवेंद्र फडणवीस यांनी जवळपास ७ वर्ष गृहमंत्रीपद सांभाळलं आहे. मग जर त्यांच्याजवळ चुकीच्या कारवाया करणाऱ्यांचे रेकॉर्डिंग असतील तर त्यांनी ते लपवून का ठेवले? त्यांच्यामध्ये दम असेल तर कारवाई करावी', असं नाना पटोले यांनी म्हटलं आहे. 'जर अनिल देशमुख यांची चुकी असेल तर त्यांच्यावरही कारवाई करा. पण अशा प्रकारे सत्तेचा अधिकार वापरून विरोधकांना धमकावण्याचं पाप देवेंद्र



फडणवीस करत आहेत, हे आपण पाहिलं आहे. अनिल देशमुख जेव्हा जेलमधून बाहेर आले होते, तेव्हाच त्यांनी सांगितलं होतं की, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याविरोधात बोलण्यासाठी माझ्यावर दबाव होता. हे देशमुखांनी आधीच स्पष्ट केलेलं आहे. पण तेव्हाही देवेंद्र फडणवीस काहीही बोलले नाहीत', असंही नाना पटोले म्हणाले. 'देवेंद्र फडणवीस आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर धमकावण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे हे सर्व संशयास्पद वाटत आहे. आजच अनिल देशमुख यांनी प्रसारमाध्यमांना काही फोटो दाखवले आहेत. त्यामुळे देवेंद्र फडणवीसांमध्ये दम असेल तर या गोष्टींची वास्तविकता महाराष्ट्रासमोर मांडली पाहिजे. हे त्यांचं कर्तव्य आहे, कारण ते राज्याच्या गृहमंत्री पदाच्या खुर्चीवर बसलेले आहेत.

### '...तर आज अनिल देशमुख जेलमध्ये असते', संजय शिरसाट यांचं मोठं विधान

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये सध्या आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु आहे. अनिल देशमुख यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर खोटं प्रतिज्ञापत्र देण्यासाठी दबाव टाकल्याचा आरोप केला आहे. तर देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याकडे अनिल देशमुख यांच्या रेकॉर्डिंग असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये दावे-प्रतिदावे केले जात आहेत. यावर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते, आमदार संजय शिरसाट यांनीही भाष्य करत विरोधकांवर हल्लाबोल केला आहे. 'विरोधकांना वाटतं की आम्ही सुडाचं राजकारण करतो, पण जर हेच करायचं असंत तर आज अनिल देशमुख जेलमध्ये असते', असं विधान संजय शिरसाट यांनी आज माध्यमांशी बोलताना केलं.



मराठा आणि ओबीसी आरक्षणाबाबत बोलताना संजय शिरसाट म्हणाले, 'दोन्ही समाजात भांडण लावून आपली राजकीय पोळी भाजण्याचा विरोधकांचा प्रयत्न आहे. एकीकडे मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला फूस लावायची आणि दुसरीकडे लक्ष्मण हाके यांच्या आंदोलनाला फूस लावायची. दोघांच्या मागण्या काय आहेत? यावर कधी तोडगा काढायचा नाही. दोन्ही समाजामध्ये तोडगा निघाला तर विरोधकांचं राजकारण संपेल. मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात विरोधकांची भूमिका काय? हे कधीही त्यांनी स्पष्ट केलं नाही', असा हल्लाबोल संजय शिरसाट यांनी केला. शिरसाट पुढे म्हणाले, 'आम्ही तरी कुणबी नोंदी सापडलेल्या आहेत, त्या देण्याचा प्रयत्न केला. तसेच मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा प्रयत्न केला. ओबीसींनाही विश्वास देण्याच काम आम्ही केलं. हे सर्व असताना विरोधकांना वाटतं की या सर्व गोष्टींचं क्रेडीट सत्ताधाऱ्यांना जाईल.

### 'प्रकाश आंबेडकरांचे आरोप माझ्यासाठी धक्कादायक', मनोज जरांगेंचं वक्तव्य, 'बच्चू कडू..'

■ मुंबई : नितीन देवळेकर

मराठा आरक्षणावरुन सध्या राज्यात वातावरण चांगलंच तापलं आहे. अशात सत्ताधारी विरुद्ध विरोधक असा सामना पाहण्यास मिळतो आहे. मनोज जरांगे टीकेला उत्तरं देत आहेत. प्रकाश आंबेडकर आणि पंकजा मुंडे या दोघांनाही जरांगेंनी उत्तर दिलं आहे. प्रकाश आंबेडकर यांनी जो आरोप केला तो माझ्यासाठी शॉकिंग आहे असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे. मला मराठा समाजाची शक्ती वाढवायची आहे. मराठा समाज मोठा व्हावा हे माझं स्वप्न आहे. मात्र अनेकांना तसं वाटत नाही. मराठा समाज मोठा व्हावा असं अनेकांना वाटत नाही. बच्चू कडूंनी मला ऑफर दिली आहे, त्याबाबत समाजाच्या बैठकीत २९ ऑगस्टला निर्णय घेऊ असं मनोज जरांगेंनीम्हटलं आहे. तसंच प्रकाश आंबेडकरांचा आरोप शॉकिंग असल्याचंही मनोज जरांगे म्हणाले,प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या आरोपांवर माझा विश्वासच बसत नाही. प्रकाश आंबेडकरांचे आरोप माझ्यासाठी शॉकिंग आहेत. मनोज जरांगे आणि देवेंद्र फडणवीस यांचं भांडण नकली आहे. मनोज जरांगे आणि देवेंद्र फडणवीस यांचे दाखवायचे दात आणि खायचे दात वेगळे आहेत, अशी टीका प्रकाश आंबेडकरांनी केली होती. त्यानंतर मनोज जरांगेंनी हे आरोप माझ्यासाठी शॉकिंग असल्याचं म्हटलं आहे. हे आरोप



प्रकाश आंबेडकरांनी केलेत यावर विश्वासच बसत नाही असंही मनोज जरांगेम्हणाले. मनोज जरांगे यांनी पंकजा मुंडेंबाबत कोणत्याही प्रश्नाचं उत्तर देणार नाही असं म्हटलं आहे. आरक्षणाला कोण विरोध करतं आहे हे सामान्य माणसांनी समजून घेणं आवश्यक आहे असंही मनोज जरांगे म्हणाले. पंकजा मुंडे यांनी मनोज जरांगे यांच्या टिकेला प्रत्युत्तर दिले असून जरांगे यांनी माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल आभार असा टोला लगावत कोणी काहीही बोलेल त्यावर मी प्रतिक्रिया देणार नसल्याचे त्या म्हणाल्या होत्या.

### 'विधानसभेत १०० ओबीसी आमदार पाठवा'; आंबेडकर यांच्या 'आरक्षण बचाव यात्रे'ला सुरुवात

■ मुंबई : गणेश बागडे

राज्यात सर्वाधिक संख्येने इतर मागासवर्गीय (ओबीसी) असताना त्यांना राजकीय प्रतिनिधित्व अल्प का, असा सवाल करत आगामी विधानसभा निवडणुकीत ओबीसींचे १०० पेक्षा अधिक आमदार विधानसभेत पाठवा, असे



आवाहन 'वंचित बहुजन आघाडी'चे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले. चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून गुरुवारी सकाळी 'आरक्षण बचाव यात्रे'स प्रारंभ झाला, त्या वेळी ते बोलत होते. अनुसूचित जात व जमातीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दुप्पट करावी, मागासवर्गीयांचे पदोन्नतीमधील आरक्षण पूर्ववत करावे आणि ओबीसी आरक्षण सांविधानिक करावे या मागण्या आंबेडकर यांनी केल्या. मराठा समाजाच्या व्यक्तींना दिलेली ५५ लाख कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्याचा यात्रेचा प्रमुख उद्देश असल्याचे आंबेडकर यांनी सांगितले.

### मेट्रो कामांसाठी खोदलेल्या खड्ड्यांत साचलेले पाणी, साथीच्या आजारांचा धोका

■ ठाणे : तृप्ती गोरे

वडाळा- घाटकोपर-कासारवडवली या मेट्रो चार मार्गिकेच्या कामांमुळे ठिकठिकाणी खोदकामे झाले असून या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचत आहे. महापालिकेकडून पाणी साचू नये असे आवाहन नागरिकांना केले जाते. परंतु शासकीय प्रकल्पांच्या कामांच्या ठिकाणीच पाणी साचून रोगराईला निमंत्रण मिळत असल्याचे चित्र आहे. तसेच खड्ड्यात पडून एखाद्या गंभीर अपघाताची शक्यता देखील व्यक्त केली जात आहे.

मुंबई उपनगर आणि ठाणे शहरातील रस्ते मार्गिकेवर होणारी वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून



(एमएमआरडीए) वडाळा-घाटकोपर-कासारवडवली या मार्गिकेच्या निर्माणाचे काम सुरू आहे. या कामासाठी ठाणे शहरातील पूर्व द्रुतगती महामार्ग, घोडबंदर भागात सेवा रस्ते, मुख्य रस्त्यावर ठिकठिकाणी मेट्रोचे खांब उभारणीसाठी खड्डे खणले आहेत. या खड्ड्यांभोवती पुरेसे संरक्षण पत्रे बसविण्यात येत नाही. त्यामुळे अनेकदा प्रवासी किंवा पादचारी या खड्ड्यात पडल्याच्या घटना घडल्या आहेत. पावसाळयात या खड्ड्यांमध्ये आता पाणी साचू लागले आहे. खड्ड्यांची खोली आणि रुंदी मोठी असल्याने पाण्याचे प्रमाणही अधिक आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

### मुंबईत होतोय दुसरा सी लिंक; दीड तासांचे अंतर अवघ्या २० मिनिटांत होणार पूर्ण!

■ मुंबई : यश सावंत

मुंबईकरांना दुसऱ्या सी लिंकसाठी आणखी चार वर्षांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. वांद्रे ते वर्सोवादरम्यान तयार होत असलेल्या सीलिंकसाठी नवी डेडलाइन समोर आली आहे. २०२६ पर्यंत प्रवाशांच्या सेवेत येणारा हा सीलिंक आता २०२८पर्यंत तयार होणार आहे. १७ किमी लांबीच्या या सीलिंकसाठी ठेकेदाराने नवी डेडलाइन दिली आहे. २०१८पासून मुंबईच्या या दुसऱ्या सीलिंकचे काम सुरू आहे. सुरुवातीला प्रकल्पाचे काम धीम्या गतीने सुरू होत होते. त्यामुळं २०२२ पर्यंत सीलिंकचे काम फक्त २.५ टक्क्यांपर्यंतच होऊ शकले. त्यानंतर मात्र प्रकल्पाचे बांधकाम दुसऱ्या कंपनीकडे सोपवण्यात आले आहे. २०२२ च्या अखेरीस पुलाचे बांधकाम फक्त २.५ टक्क्यांपर्यंतच होऊ शकले होते. मात्र आता पुलाचे काम १७ टक्क्यांपर्यंत पूर्ण झाले आहे. पुलासाठी



समुद्रात खांब उभारण्यात आले आहेत. तर, काम झपाट्याने पूर्ण करण्यासाठी बांधकामाचे साहित्य पोहोचवण्यासाठी फ्लोटिंग फॅक्ट्री, मिक्सिंग प्लांट आणि पंपाचा वापर करण्यात येत आहे. प्रकल्पाच्या सुरुवातीला काम उशिराने सुरू झाल्याने प्रशासनाला डेडलाइन दोन वर्षांनी वाढवावी लागली आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेचा विचार करुन सी लिंकवर चार कनेक्टर असणार आहेत. वांद्रे, कार्टर रोडस जूहू आणि वर्सोवा असे कनेक्टर असणार आहे. मुंबईतील हा दुसरा सीलिंक वांद्रे-वरळी सीलिंकला कनेक्ट करण्यात येणार आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

### देवेंद्र फडणवीसांची कथित ऑफर घेऊन आल्याचा आरोप, अनिल देशमुखांच्या रडारवर, कोण आहेत मिरजेचे समित कदम?

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

महाविकास आघाडी सरकारच्या काळात मी गृहमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांच्याकडून एक माणूस माझ्याकडे आला होता. या व्यक्तीने मला ईडीच्या कारवाईपासून वाचण्यासाठी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि अजित पवार यांच्यावर गंभीर आरोप करण्याची ऑफर दिली होती, असा आरोप अनिल देशमुख यांनी केला होता. देवेंद्र फडणवीस यांच्याकडून ऑफर घेऊन येणारी व्यक्ती म्हणजे समित कदम असल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर अचानक प्रकाशझोतात आलेले समित कदम कोण, अशा प्रश्न सर्वांनाच पडला होता. देवेंद्र फडणवीस यांच्या इतक्या निकट असणाऱ्या आणि फडणवीसांच्या महत्त्वाच्या योजना पूर्णत्वाला नेणाऱ्या



समित कदम यांच्याविषयी अनेकांच्या मनात कुतूहल निर्माण झाले होते. भाजपच्या नेत्यांकडून सध्या आमचा किंवा देवेंद्र फडणवीस यांचा समित कदम यांच्याशी कोणताही संबंध नसल्याचे सांगितले जात असले तरी सोशल मीडियावरील व्हायरल झालेल्या फोटोंमुळे फडणवीस आणि समित कदम यांच्यातील कनेक्शनभोवती निर्माण झालेले संशयाचे धुके आणखीनच गडद झाले आहे. जनसुराज्य शक्ती पक्षाचे युवा प्रदेशाध्यक्ष म्हणून समित कदम गेल्या काही वर्षांपासून धुरा सांभाळत आहेत. मूळचे मिरजेचे असलेले समित कदम यांची प्रदेशाध्यक्ष पदामुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीए आघाडीतील सर्व पक्षातील नेत्यांशी घनिष्ठ संबंध निर्माण झाले आहेत.

(शेष पृष्ठ २ वर)

महाराष्ट्र क्राईम टाइम्स





## संपादकीय

संपादक:- राकेश शंकर गोरे

## 'नीट'चा भुलभुलैय्या आणि वास्तव

'नीट' परीक्षेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाने अनेक मुद्दे निकाली निघाले आहेत. महिनाभर विद्यार्थ्यांचे मोर्चे, तमीळनाडू, कर्नाटक, महाराष्ट्रात ज्येष्ठ मंत्र्यांनी केलेली विधाने, राज्यसभा व लोकसभेतील विरोधी पक्षनेत्यांनी केलेले आरोप आणि त्याला शिक्षणमंत्र्यांनी दिलेली उत्तरे यामुळे 'नीट'चा मुद्दा तापलेला होता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखाली सलग चार दिवस झालेली अभूतपूर्व सुनावणी.

त्याच्या निकालाकडे तेवीस लाख विद्यार्थी, पालकांचे लक्ष लागले होते. याच्या खोलात वा कारणमीमांसेत न जाता यंदा दहावी, अकरावी, बारावी करणाऱ्यांच्या भविष्यासाठी 'नीट' परीक्षेमागील गौडबंगाल उलगडत परीक्षा पद्धतीत एकात्मिक बदल केले तर? परीक्षा घेणाऱ्यांच्या व देणाऱ्या, डॉक्टर बनू इच्छिणाऱ्या मुलांच्या स्वप्नांना व पालकांच्या अपेक्षांना योग्य दिशा कशी मिळेल, यावर काही विचार वाचकांपुढे ठेवत आहे.

'नीट' परीक्षा सुरू झाल्यापासून परीक्षेला बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी पन्नास टक्के विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या सरासरी गुणांना (मेडिकलच्या सर्व अभ्यासक्रमांसाठीची) किमान पात्रता ही अट आहे. एकूण परीक्षा ७२० गुणांची असते. १८० प्रश्न असतात. एका प्रश्नाला बरोबर उत्तर दिल्यास चार गुण मिळतात; उत्तर चुकल्यास एक गुण वजा होतो. यंदाची ही किमान पात्रता पातळी १६८ गुणांना होती. आरक्षणानुसार ही पातळी कमी-कमी होत जाते. तेरा लाख विद्यार्थ्यांनी यंदा ही पात्रता पूर्ण केली. याचा थेट अर्थ १८० पैकी जेमतेम ४२ प्रश्नांची उत्तरे देऊ शकणाऱ्या मुलांना पात्र ठरवले. यातूनच खरी उत्तरे निघू शकतात. केंद्रीय पद्धतीद्वारे सर्व परीक्षा घेण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आला म्हणून 'नीट' सुरू झाली. 'नॅशनल मेडिकल कमिशन'च्या निर्णयानुसार 'नीट'मध्ये पात्र नसलेला कोणताही विद्यार्थी भारतात वा जगातील अन्य




देशात जाऊन वैद्यकीय शिक्षण घेण्यास पात्र ठरत नाही. तेव्हा घटनात्मकदृष्ट्या 'नीट' बंद करणे अशक्य आहे. हे लक्षात घेतल्यास या परीक्षेत कोणते बदल शक्य आहेत, हाच विचार ठळकपणे समोर येतो.

सर्व प्रकारच्या वैद्यकीय अभ्यासक्रमात पन्नास टक्क्यांना उत्तीर्ण करतात. तोंडी परीक्षा वा लेखी परीक्षा या दोन्हींमध्ये पन्नास टक्के गुण आवश्यक असतात. वैद्यकीय क्षेत्रात विनोदाने याला रुग्ण बरा झाला नाही तरी चालेल, पण निदान तो उपचाराने बिघडू नये यासाठी घातलेली पूर्वअट असे म्हटले जाते. मग हाच नियम प्राथमिक पातळीवरच्या पहिल्या 'नीट'ला लावता आला तर? 'सीबीएसई'ची बारावीची परीक्षा संपल्यानंतर आठव्या दिवशी प्राथमिक 'नीट' घेऊन त्यात ३६० गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढच्या परीक्षेला पात्र ठरवावे. नंतर पन्नास दिवसांनी दुसरी प्रगत 'नीट' परीक्षा घ्यावी. पहिल्या परीक्षेला देशभरात यंदा चार हजार ७५० केंद्रे होती. त्यांची संख्या दुसऱ्या परीक्षेकरता जेमतेम हजारावर येईल. एका केंद्रावर तीनशे विद्यार्थी असले तरी तीन लाख विद्यार्थी ही परीक्षा देतील. यातून सर्व सहा प्रकारच्या डॉक्टरी अभ्यासक्रमांसाठीची क्रमवारी ठरेल. एमबीबीएस, बीडीएस, व्हेटर्नरी, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी या सर्व अभ्यासक्रमांसाठी अखिल भारतीय जागांची उपलब्ध संख्या तीन लाखांपेक्षा कमीच आहे. ही परीक्षा काटेकोरपणे घेणे व निकाल जेमतेम दहा दिवसात लावणे नॅशनल टेस्टिंग एजन्सीला सहज शक्य आहे. पहिल्या परीक्षेची काठिण्य पातळी कमी करून दुसरी परीक्षा सध्याच्या पातळीवरची ठेवणेही शक्य आहे. पुन्हा गुणांकडे यायचे झाले तर एमबीबीएस अभ्यासक्रमाला सरकारी महाविद्यालय मिळण्यासाठी देशभरात फक्त पन्नास हजार जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी यंदा बहुतेक किमान सहाशे गुण लागतील. म्हणजेच १८०पैकी दीडशे प्रश्न सोडवणारा विद्यार्थीच सरकारी महाविद्यालयामध्ये जाऊ शकेल. त्या पुढच्या सगळ्या विद्यार्थ्यांसाठी खासगी महागड्या महाविद्यालयामधील प्रवेश उपलब्ध असेल. वाचकांच्या माहितीसाठी आकड्यातून लिहायचे तर विविध संस्था वा खासगी विद्यापीठामध्ये वर्षाला १२ ते २८ लाखांची फी भरावी लागते. पाच वर्षाची फी आणि बाहेरगावी राहण्याचा महिना पंधरा हजाराप्रमाणे सहा वर्षांचा खर्च करू शकणाऱ्या पालकांची संख्या भारतात एक टक्काही नाही. आता असा प्रश्न पडेल की पहिल्या 'नीट' परीक्षेचे काय करायचे? फक्त चाळणी परीक्षा म्हणून घ्यायची का? याची उत्तरे सोपी आहेत. सध्याच्या परीक्षा पद्धतीप्रमाणेच पन्नास पर्सेंटाइलमध्ये बसणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरवावे. गेली चार-पाच वर्षे सुमारे चाळीस हजार भारतीय परदेशात जाऊन वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. ते जेमतेम वीस ते तीस लाखांत पूर्ण होते. 'नॅशनल मेडिकल कमिशन'च्या आदेशानुसार व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार या विद्यार्थ्यांना त्या देशात जाऊन शिकण्यासाठी पात्रता द्यायला पहिली परीक्षा ठेवावी. फिजीओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, स्पीच ऑडिओ थेरपी, नर्सिंग बीएस्सी व सर्व स्वरूपाचे वैद्यकीय टेक्निशियनसाठी पदवी अभ्यासक्रम यांचे प्रवेश या परीक्षेद्वारे करावेत. समजा एखाद्या विद्यार्थ्याला पहिल्या परीक्षेत पाचशे किंवा सहाशे गुण मिळाले तर ते गुण त्याने दुसरी परीक्षा न देतासुद्धा प्रवेशप्रक्रियेसाठी ग्राह्य धरावेत. मात्र कोणत्याही अभ्यासक्रमाच्या 'सरकारी वैद्यकीय महाविद्यालयासाठी' तो विद्यार्थी पात्र ठरणार नाही, हे अर्ज भरताना स्पष्ट करावे. 'नीट'च्या परीक्षेसाठी चार ते सहा लाख रुपये भरून महागडा क्लास लावला म्हणजे डॉक्टर होता येते, ही चुकीची समजूत आहे. एकदा नीट देऊ, दोनदा देऊ, तीनदा प्रयत्न करू, अशा चुकीच्या भ्रमात विद्यार्थ्यांची फरफट होते. यंदाच्या वर्षी 'नीट'मध्ये जेमतेम अडीचशे-तीनशे गुण मिळालेल्या अनेक विद्यार्थ्यांनी दुसऱ्यांदा नीट दिली होती, हे येथे नमूद करतो.

# रोजगार वाढले: वेतनपातळीचे काय?

देशात गुंतवणुकीला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी उत्पादक वर्गाला अनुकूल अशी कामगार धोरणे स्वीकारण्याचा प्रयत्न सुरू आहे. तथापि, त्याचवेळी कामगार वर्गाच्या मूलभूत हक्कांकडेच सरकारचे होत असलेले दुर्लक्ष चिंतेची बाब आहे.

केंद्र सरकारचा २०२४-२५साठीचा अंतिम अर्थसंकल्प नुकताच सादर झाला. त्यामध्ये देशातील रोजगाराचे सकारात्मक चित्र रेखाटल्याचे दिसते. सरकारने प्रकाशित केलेल्या आर्थिक पाहणी अहवालात नियतकालिक श्रमबल अहवाल-२०२३ चा आधार देऊन रोजगारामध्ये वाढ झाल्याचे स्पष्ट केले आहे. याव्यतिरिक्त मागील महिन्यात रिझर्व्ह बॅंकेने प्रकाशित केलेल्या अहवालामध्येही आर्थिक वर्ष २०२४ या काळात देशातील रोजगारामध्ये सहा टक्क्यांनी वाढ झाल्याचे नमूद केले आहे.

मागील वर्षीच्या (३.२३) तुलनेत या वर्षीचा वृद्धी दर जवळपास दुपटीने वाढला असल्याचे रिझर्व्ह बॅंकेने स्पष्ट केले आहे. एकंदरीतच, रोजगारात वाढीची प्रवृत्ती असून देशाच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा दर्शवणारी आहे, असे म्हणता येईल.

मात्र, रोजगार वाढतानाच कामगारांची वेतनपातळी वाढत्या खर्चाच्या तुलनेत पुरेशी आहे का? त्यांना सामाजिक सुरक्षेचे लाभ मिळतात का? कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होते का? यासारखे प्रश्न अनुत्तरितच राहतात. आज सरकार गुणवत्तापूर्ण रोजगाराचा विचार मांडत असताना कामगार वर्गाच्या या मूलभूत प्रश्नांकडेही गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे, हे नक्कीच.

वास्तविक नियतकालिक श्रमबल सर्वेक्षण अहवाल-२०२३नुसार, रोजगारातील वाढ प्रामुख्याने स्वयंरोजगार वर्गातील आहे. देशातील एकूण रोजगारामध्ये जवळपास ५७.३ टक्के एवढे स्वयंरोजगार वर्गातील कामगार कार्यरत आहेत. नियमित वेतनधारक आणि नैमित्तिक कामगारांचे प्रमाण अनुक्रमे २१ आणि २२ टक्के आहे.

या वर्गातील कामगारांची ग्रामीण आणि शहरी विभागणी पाहता, ग्रामीण भागातील स्वयंरोजगार वर्गातील कामगारांचे प्रमाण ६३, तर शहरी भागात ते जवळपास ४० टक्के आहे. ग्रामीण भागात नियमित वेतनधारक आणि नैमित्तिक कामगारांचे प्रमाण अनुक्रमे १२ आणि २५ टक्के असून, शहरी भागासाठी ते अनुक्रमे ४८ आणि



१२.४ टक्के असल्याचे दिसते.

महिला कामगारवर्गाचा विचार करता, ग्रामीण भागामध्ये स्वयंरोजगार वर्गातील कामगारांमध्ये महिला कामगारांचे प्रमाण लक्षणीय आहे. यामध्ये प्रामुख्याने शेती व्यवसायातील महिला कामगारांचा समावेश होतो. ग्रामीण महिला कामगारांमध्ये नियमित वेतनधारक कामगार अत्यल्प असल्याचे दिसते. कामगारांच्या वेतनपातळीचा विचार करता, स्वयंरोजगार वर्गातील कामगारांची सरासरी मासिक वेतनपातळी तेरा हजार ३४७ रुपये असून, पुरुष आणि महिला कामगारांचे सरासरी वेतन अनुक्रमे पंधरा हजार ७६३ आणि पाच हजार ६३६ रुपये असल्याचे दिसते. ग्रामीण आणि शहरी भागातील स्वयंरोजगार कामगारांचे सरासरी वेतन अनुक्रमे अकरा हजार ६११ आणि एकोणीस हजार ८०७ रुपये राहिले आहे.

वेगवेगळ्या क्षेत्रांत नैमित्तिक म्हणजेच रोजंदारीवर काम करणारे कामगार रोज ४०३ रुपये एवढ्या सरासरी रोजंदारीवर काम करीत आहेत. त्यांच्या मासिक वेतनाचे गणन बारा हजार रुपयांच्या घरात येते. नैमित्तिक स्वरूपाच्या कामगारांच्या वेतनाचे ग्रामीण आणि शहरी, पुरुष आणि महिला असे वर्गीकरण पाहिल्यास देशातील नैमित्तिक स्वरूपातील कामगारांच्या वेतनाचे गंभीर वास्तव समोर येते.

देशातील महिला कामगारांचा विचार करता, स्वयंरोजगार वर्गातील महिला कामगार पाच हजार ६३६ रुपये तर नियमित वेतनधारक महिला कामगार तेरा हजार ८२५ रुपये एवढ्या मासिक वेतनावर काम करीत आहेत. नैमित्तिक वर्गातील महिला कामगारांना मिळणारी दैनिक मजुरी ही २९० रुपये एवढी नगण्य असून, तिचे मासिक गणन नऊ हजार रुपयांपेक्षाही कमी दिसते. थोडक्यात, देशातील कामगारांची वेतन पातळी अत्यल्प असल्याचेच स्पष्ट होते. देशातील रोजगार दर वाढणारा असला तरी, वेतनपातळीचे वास्तव कामगार वर्गासाठी लाभदायक आहे का? याचा विचार होणे आवश्यक आहे.

याव्यतिरिक्त, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कामगार धोरणांमध्ये होत असलेल्या बदलांमुळे कंत्राटी आणि तात्पुरत्या स्वरूपातील नोकऱ्यांचे प्रमाण वेगाने वाढते आहे. अशा स्थितीत कामगारांच्या कामाची हमी, कामाचे स्वरूप, वेतनपातळी आणि सामाजिक सुरक्षितता लाभांबाबत प्रश्नचिन्ह आहे.

परिणामी आज देशातील एकूण नियमित वेतनधारक कामगारांपैकी जवळपास ५८.६ टक्के कामगार कोणत्याही लेखी कराराशिवाय नोकरी करीत आहेत; तर जवळपास ५४ टक्के कामगारांना सामाजिक सुरक्षेचे लाभ मिळत नाहीत. जवळपास ४७ टक्के नियमित वेतनधारक कामगारांना पगारी रजा मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. स्वयंरोजगार व नैमित्तिक वर्गातील कामगारांसाठीच्या अशा तरतुदींची गोष्ट तर दूरच. देशातील रोजगारामध्ये वाढ होत असताना अशा प्रकारच्या कामगारांची संख्या वाढणार असेल तर अर्थव्यवस्थेला त्याचे लाभ मिळतील का? असा प्रश्न पडतो.

कामगारांना मिळणारे वेतन हे त्यांचा मासिक दरडोई उपभोग खर्च भागविण्यासाठीही पुरेसे नसल्याचे वास्तव आहे. केंद्र सरकारद्वारे प्रकाशीत केल्या जाणाऱ्या देशातील कौटुंबिक उपभोग खर्च सर्वेक्षण अहवाल-२०२३ मधील आकडेवारीनुसार, ग्रामीण भागातील कुटुंबांचा मासिक दरडोई उपभोग खर्च तीन हजार ७७३ रुपये असून, शहरी भागासाठी तो सहा हजार ४५९ रुपये असल्याचे दिसते.

उदा. एका कुटुंबात चार सदस्य आहेत असे गृहीत धरले तर ग्रामीण भागासाठी मासिक कौटुंबिक उपभोग खर्चाचा आकडा पंधरा हजार रुपये, तर शहरी भागासाठी तो पंचवीस हजार ८३६ रुपये येतो. हा खर्च स्वयंरोजगार आणि नैमित्तिक कामगार वर्गाच्या वेतनपातळीपेक्षा लक्षणीय प्रमाणात अधिक आहे. तसेच तो नियमित वेतनधारक कामगारांच्याही वेतनपातळीपेक्षा जास्त असल्याचेच दिसते. परिणामी, कामगारवर्गाला अशा प्रकारे वेतन आणि खर्चातील तुटीचा प्रकर्षाने सामना करावा लागणे नित्याचेच आहे.

कामगारांना भविष्यातील खर्चाची तरतूद म्हणून बचत असो वा गुंतवणूक यासाठी तरतूद करणे शक्य होते की नाही, असा मूलभूत प्रश्न पडतो. अशा प्रकारे वाढता उपभोगखर्च आणि तोकडी वेतनपातळी यामुळे कामगारांना संपत्तीसंचयन अशक्यप्राय होते.बहुसंख्याक कामगार वर्गाचा देशाच्या एकूण संपत्तीतील वाटा नगण्य असण्यामागे हे प्रमुख कारण असल्याचे स्पष्ट होते.

मुळात, वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि वाढत्या हातांना काम देण्याच्या उद्देशाने देशातील गुंतवणुकीला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी उत्पादक वर्गाला अनुकूल अशी कामगार धोरणे स्वीकारण्याच्या प्रयत्नात कामगार वर्गाच्या मूलभूत हक्कांकडेच सरकारचे होत असलेले दुर्लक्ष चिंतेची बाब आहे.

कामगार वर्गाच्या अशा प्रकारे होत असलेल्या हेळसांडीचा विपरीत परिणाम त्यांच्या उत्पादकतेवर होणार हे निश्चित. आज भारत हा लोकसंख्येच्या बाबतीत जगातील अग्रणी देश म्हणून पुढे येत असताना देशातील कामगार वर्गाची वेतनपातळी ही किमान उपभोग खर्चाशी साधर्म्य साधणारी असणे अपेक्षित आहे.

तसेच गुणवत्तापूर्ण रोजगाराचा विचार होत असताना कामगारांना दर्जेदार सुविधांच्या उपलब्धतेचा मुद्दाही तितकाच महत्त्वाचा आहे, असे म्हणता येईल. आज प्रत्येक क्षेत्रात कंत्राटी व तात्पुरत्या स्वरूपावर भरती केल्या जाणाऱ्या कामगारांच्या भरवशावर एवढ्या मोठ्या अर्थव्यवस्थेचा गाडा पुढे नेणे कितपत शक्य आहे, याचाही गांभीर्याने विचार केला पाहिजे. कामगार वर्गाच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी सरकार प्रयत्नशील राहील एवढीच अपेक्षा!

पान १ वरुन...

### अजित पवारांसह ४१...

अजित पवार आणि ४१ आमदारांना ही नोटीस बजावली आहे. तसंच ही विचारणा करण्यात आली आहे की तुम्हाला अपात्र का करण्यात येऊ नये? चार आठवड्यात या नोटिशीला उत्तर द्यायचं आहे. ही मुदत त्यांना देण्यात आली आहे. शिवसेनेचं जे आमदार अपात्रता प्रकरण आहे त्याबरोबरच हे प्रकरण घेतलं जाईल असंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्या आमदार अपात्रता प्रकरणांची सुनावणी एकापाठोपाठ घेतली जाईल असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी ३ सप्टेंबरला होणार आहे. त्यामुळे ३ सप्टेंबरलाच हे मॅटर ऐकलं जाईल अशी चिन्हं आहेत. तोपर्यंत अजित पवार गटाने उत्तर द्यायचं आहे असंही सिद्धार्थ शिंदे यांनी सांगितलं.

### मुंबईत होतोय दुसरा...

तर, पुढील प्रस्तावीत वर्सोवा -सीलिंकदेखील या नव्या सीलिंकला जोडण्यात येणार आहे. समुद्रावर बांधण्यात येणाऱ्या या पुलामुळं वांद्रे ते वर्सोवा अंतर फक्त २० ते २५ मिनिटांत पूर्ण होणार आहे. सध्या हे अंतर पार करण्यासाठी दीड के दोन तासांचा वेळ लागतो. मात्र, या पुलामुळं अंतर निम्म्यावर येणार आहे. तर, हे तिन्ही सीलिंक पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील वाहतूक कोंडीची समस्या कमी होण्याची शक्यता आहे.वांद्रे वर्सोवा हा सागरी सेतू अंधेरीतील वर्सोवा येथे सुरू होणार असून तो कार्टर रोड जुहू मार्गे वांद्रेपर्यंत पोहोचणार आहे. तिथून हा पूल वांद्रे ते वरळी या सी लिंकला जोडला जाणार आहे. हा पूल १७.१७ किमी इतका असणार आहे. वांद्रे, वर्सोवा आणि वरळी परिसरात दररोज ४-५ लाख वाहनांची ये-जा होत असते. या प्रकल्पानंतर वाहनांना लागणाऱ्या वेळेत बचत होणार आहे. दीड तासांचा प्रवास २०-२५ मिनिटांवर येणार आहे.

### मेट्रो कामांसाठी खोदलेल्या...

ठाणे महापालिकेकडून दरवर्षी नागरिकांना घरामध्ये पाणी साठवून ठेऊ नका असे आवाहन केले जाते. परंतु एमएमआरडीएकडूनच, खड्डयांमध्ये साठलेल्या पाण्याचा निचरा केला जात नाही. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, साथीचे आजार पसरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच या खड्डयांभोवती पुरेसे संरक्षण पत्रे देखील बसविण्यात आले नाही. त्यामुळे एखादा वाहन चालक पाण्याने भरलेल्या खड्डयात पडू मोठ्या अपघाताची शक्यता व्यक्त केली जात आहे. येथील पाणी तात्काळ उपसावे अशी मागणी नागरिक करत आहेत.पावसाने उसंत घेतल्यानंतर खड्डयांमध्ये साचलेले पाणी पंपद्वारे बाहेर काढण्यात येते. ज्या ठिकाणी मेट्रोची कामे सुरू आहे त्याठिकाणी साचलेल्या पाण्याचा वेळोवेळी निचरा केला जातो असे एमएमआरडीए प्राधिकरणाकडून स्पष्ट करण्यात आले.

### देवेंद्र फडणवीसांची कथित ऑफर....

समित कदम यांचे वडील बाळासाहेब कदम हे मिरजेचे नगराध्यक्ष राहिलेले आहेत. समित कदम यांनी गेल्या काही वर्षांमध्ये जनसुराज्य शक्ती पक्षाच्या माध्यमातून कोल्हापूर, सांगली, नाशिक, यासह महाराष्ट्राभर पक्षांच्या माध्यमातून युवकांचे संघटन करण्याचे काम केले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी समित कदम यांचे कौटुंबिक संबंध असल्याचेही सांगितले जाते.

**समित कदमांनी अनिल देशमुखांचे आरोप फेटाळले**

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप करताना समित कदम यांचं नाव घेत फडणवीस आणि समित कदम यांना आपल्याला भेटायला पाठवलं होतं असा आरोप केला होता. यामुळे मूळच्या सांगलीतील मिरज मधील असलेले समित कदम यांचे नाव चर्चेत आलंय. देवेंद्र फडणीस आणि समित कदम यांचे घनिष्ट संबंध असल्याचाही आरोप आज देशमुख यांनी केला. यावर समित कदम यांनी देखील प्रत्युत्तर दिले. अनिल देशमुख यांनी केलेले सर्व आरोप समित कदम यांनी फेटाळून लावले आहेत. अनिल देशमुख यांचं डोकं फिरलं आहे. अनिल देशमुख अन्न व नागरी पुरवठा मंत्री असल्यापासून त्याचे आणि माझे संबंध आहेत. या गोष्टीचा त्यांना विसर पडला असेल. माझे देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतचे फोटो हे वर्तमानपत्रांमध्ये छापून आले आहेत, यामध्ये काही नवीन नाही, असे समित कदम यांनी स्पष्ट केले. तसेच संजय राऊत यांनी आरोप केलेल्या विधानावर देखील समित कदम यांनी देवेंद्र फडणीस यांचा विषय निघेल तेथे संजय राऊत यांनी बोलणं बंधनकारक झालेय असं म्हटलंय. तसेच समित कदम यांना वाय दर्जाची सुरक्षा दिली जाते यावर सुमित कदम यांनी मी घटक पक्षाचा अध्यक्ष आहे त्यामुळे मला सुरक्षा दिले याचा शोध त्यांनी घेऊ द्या, असेही कदम म्हणाले.

### नायगावमध्ये ॲक्सिस बॅंकेचे एटीएम फोडले, ४ लाख ३० हजारांची रोकड लंपास

■ वसई : विशेष प्रतिनिधी

नायगाव पूर्वेच्या टीवरी राजावळी रस्त्यालगत ॲक्सिस बॅंकेचे एटीएम चोरट्यांनी फोडले आहे. बुधवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास ही घटना घडली. यात चोरट्यांनी ४ लाख ३० हजारांची रोकड लंपास केली आहे. नायगाव पूर्वेच्या टीवरी राजावळी रस्त्यालगत नवकार फेज थ्री इमारत आहे. या इमारतीत ॲक्सिस बॅंकेचे एटीएम आहे. बुधवारी पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी एटीएममध्ये प्रवेश करून गॅस कटरच्या सहाय्याने हे एटीएम फोडले. यातील चार लाख २९ हजार ७०० इतकी रोकड लंपास केली आहे. नायगाव पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. एटीएम फोडताना त्या ठिकाणी दोन व्यक्ती असल्याचे समजले आहे, मात्र आणखी त्याचे साथीदार सोबत असण्याची शक्यता आहे. त्याचाही तपास सुरू असल्याची माहिती नायगाव पोलिसांनी दिली.


**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**निविदा सूचना**

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां.विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. ब-१ को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक २४.७.२०२४ ते ३१.७.२०२४ पर्यंत देण्यांत येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक १.८.२०२४ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नविन विधान भवन मुंबई इमारती १८ मजल्यावरील कमिटी चेअरमन ऑफिस मध्ये फर्निचरची व्यवस्था करणे. | ८,४०,६७३/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| २ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील १ मजल्यावरील डाव्या बाजूस फ्लोरींग, डॅडो, खिडक्या पॅसेजची दुरूस्ती करणे. | ८,४३,१५७/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ३ | नविन विधान भवन मुंबई येथील १९ व्या मजल्यावरील समिती अध्यक्ष कार्यालय येथे फलोरींग, फॉल्स सिलींग, दरवाजे,खिडक्या, पॅनलिंगची नुतनीकरण करणे. | ८,४४,९९८/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ४ | मानव अधिकारी आयोग कार्यालय मुंबई येथील विभाग आणि कोर्ट नं. १,२,३,४, खाते येथे, प्लास्टर, रंगकाम, दरवाजे, खिडक्या, फ्लोरिंगची दुरूस्ती करणे. | ८,३६,७३४/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ५ | मंत्रालय मुंबई मुख्य व विस्तार इमारतीमध्ये जिप्सम फॉल्स सिलिंग, ग्लास पार्टीशन, वॉल पेपर इ. दुरूस्ती आणि खुर्ची पुरवठा करणे. | ५,६३,३६५/- | ५,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ६ | नविन विधानभवन मुंबई टॉवर आणि डोम इमारतीच्या प्रसाधनगृहाच्या खिडक्यांना बाहेरुन स्टील जाळी बसविणे. | ८,४३,८३६/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ७ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील १ ते ३ मजल्यावरील विविध रुमचे वुडन फ्लोरींग, वॉल पेपर दुरूस्ती करणे. | ८,४२,८३४/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ८ | मंत्रालय मुंबई येथील विस्तार इमारत मधील पॅसेज व जिना येथे पॉलिमर माईक्रो कॉंक्रिट आणि रंगकाम, दुरूस्ती करणे. | ८,३९,४६७/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ९ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथील ४ ते ६ मजल्यावरील विविध रुमचे वुडन फलोरींग, वॉल पेपर दुरूस्ती करणे. | ८,३९,२०४/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १० | नविन प्रशासकीय इमारत मुंबई येथील १४, १५, १८, २०, मजल्यावरील वुडन कॅबिन, स्टोरेज युनिट, मॅनेजर कॅबिन रंगकाम, पॉलिश, दुरूस्ती करणे. | ८,१०,७१६/- | ८,२००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ११ | मंत्रालय मुंबई मुख्य इमारतीच्या ६ मजल्यावरील ओएसडी कॅबिन सीएम वॉर रुम येथे नुतनीकरण करणे. | ६,६५,७९५/- | ६,७००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सुचना फलकावार सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र. इशवि/निलि/ ९८८४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
इलाखा शहर विभाग, २ रा माळा,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक :- १२/७/२०२४

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

प्रत :- उप अभियंता, दक्षिण, पश्चिम, मध्य उप विभाग आणि अधीक्षक आमदार निवास मुंबई यांना माहितीसाठी रवाना.
प्रत :- सुचनाफलक

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/११५६


Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

महाराष्ट्र क्राईम टाइम्स




# गुप्त बैठकांच्या चर्चांवर मनोज जरांगेंचं मोठं विधान; म्हणाले, 'राजकारणात काही गोष्टी...'

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न गेल्या काही दिवसांपासून चांगलांच चर्चेत आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारकडे केलेली आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी त्यांनी अनेकदा उपोषणही केलं. मात्र, मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, या मागणीबाबत राज्य सरकारने अद्याप कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही.

यातच मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीला ओबीसींनी विरोध केला असल्यामुळे पुन्हा एकदा मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न तापला आहे. अशातच विधानसभेची निवडणूक जवळ येत असल्याच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे यांनी निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे काही उमेदवार पाडण्याचा इशाराही अनेकदा दिला. यानंतर आता मनोज जरांगे यांनी गुप्त बैठकांबाबत मोठं विधान केलं आहे. 'राजकारणात काही गोष्टी उघड करायच्या नसतात, तर संकेत पाळायचे असतात', असं सूचक विधान मनोज जरांगे यांनी बोलताना केलं. त्यांच्या या विधानाचा अर्थ काय? याबाबत आता तर्कवितर्क लावले जात आहेत. तुमच्याही काही गुप्त बैठका असल्याच्या चर्चा आहेत. या प्रश्नांवर बोलताना मनोज जरांगे म्हणाले, 'राजकारणात काही गोष्टी उघड करायच्या नसतात. तसेच काही संकेत असतात ते पाळायचे असतात. राजकारणातला संकेत ज्याला कळतो तो यशस्वी होतो. त्यामुळे आमच्या बैठका आहेत, पण त्या कशाच्या बैठका आहेत? ते येणाऱ्या ५ ते ६ दिवसांनी आम्हीच जाहीर करणार आहोत. सामाजिक न्यायासाठी ही राजकीय लढाई आहे. त्यामुळे आमचा नाईलाज आहे', असं सूचक विधान मनोज जरांगे यांनी केलं.

राजकारणातील गुप्त बैठका काय असतात? हे तुम्हालाही समजायला लागलं असल्याची टीका केली जाते, यावर बोलताना मनोज जरांगे म्हणाले, 'आम्हाला या गोष्टी सत्ताधारी आणि विरोधकांनी शिकवल्या आहेत. कारण आम्ही त्यांना वारंवार सांगत होतो की आम्हाला राजकारणात जायचं नाही. आजही आम्ही सांगत आहोत की आम्हाला राजकारणात जायचं नाही. मात्र, आमचं आरक्षण आम्हाला द्या. राजकारण तुमचं तुम्हाला लखलाभ. आरक्षण दिलं तर मराठा समाज तुम्हाला डोक्यावर घेऊन नाचेल. या शब्दाचा अर्थ सत्ताधारी लोकांनी समजून घ्यावा. अन्यथा पश्चातापाशिवाय तुमच्या हातात काहीच राहणार नाही', असं इशाराही मनोज जरांगे यांनी सत्ताधाऱ्यांना दिला. दरम्यान, याचवेळी मनोज जरांगे यांनी आमदार सदाभाऊ खोत यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देत त्यांच्यावरही टीका केली.



# 'भाजपने विधानसभा निवडणुकीत २८८ जागा लढवाव्यात'; खासदार नारायण राणे यांच्या वक्तव्यावर शिंदे गटाकडून नापसंती

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

भाजपने विधानसभा निवडणुकीत २८८ जागा लढवाव्यात, अशी टिप्पणी माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी भाजप प्रदेश कार्यालयात शुक्रवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली. मात्र पक्षाचे वरिष्ठ नेते महायुतीतील जागावाटपाचा निर्णय घेतील, अशी भूमिका मांडली. राणे यांच्या या वक्तव्याबाबत शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी अक्षेप घेतला असून भाजप २८८ जागा लढणार असेल, तर महायुती कशाला आहे, असा सवाल केला. केंद्रीय अर्थसंकल्पावर विरोधकांनी केलेल्या टीकेत कोणतेही तथ्य नाही आणि महाराष्ट्रातील विविध योजनांसाठी केंद्र सरकारने मोठा निधी दिला असल्याचे सांगून राणे यांनी राजकीय मुद्द्यांवरील पत्रकारांच्या प्रश्नांवरही उत्तरे दिली. महायुतीतील जागावाटपाची चर्चा, कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील, याविषयीच्या प्रश्नांवर बोलताना राणे यांनी भाजपने सर्वच २८८ जागा लढवाव्यात, असे भाष्य केले. राज ठाकरे विधानसभा निवडणुकीत स्वबळावर लढणार असल्याचे मनसेने जाहीर केले आहे, याबाबत विचारता त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत. पण निवडणूक आचारसंहिता लागू होईपर्यंत जागांची संख्या कमी-जास्त होईल, काही समझोता होईल, असा टोलाही लगावला.



# '..तर गद्दारांना पाडण्यासाठी विधानसभा निवडणूक लढणार', चंद्रकांत खैरेंची घोषणा

■ **मुंबई : सम्यक कासारे**

**महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक पुढील महिन्यात जाहीर होऊ शकते. सगळयाच पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी २२५ ते २५० जागा लढवण्याची घोषणा सुरु केली आहे. त्याच प्रमाणे महाविकास आघाडी आणि महायुती यांनीही कंबर कसली आहे. अशात शिवसेनेचे चंद्रकांत खैरे यांनी आपण आता विधानसभा निवडणूक लढणार आणि गद्दारांना हरवणार असं म्हटलं आहे.**

'उद्धव ठाकरेंनी जर आदेश दिला तर मी विधानसभा लढवेन कारण मला गद्दारांना पाडायचं आहे. गद्दार या ठिकाणी माझ्यामुळे निवडून आले. कारण मी त्यांच्या मतदानासाठी प्रचार केला. जे फुटले त्याचं आम्हाला दुःख आहे. गद्दार सध्या नाटकं करत आहेत. आता जर गद्दारांना पाडायचं असेल तर मी नक्की निवडणूक लढवेन.' असं चंद्रकांत खैरेंनी म्हटलं आहे.'१९९० मध्ये मी आमदार झालो, १९९५ मध्ये आमदार झालो. त्यानंतर मला शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरेंनी दिल्लीत पाठवलं. दिल्लीत मी २० वर्षे होतो. यावेळी या ठिकाणी धोका झाला. जे आत्ताचे गद्दार आहेत त्यांना पैशांची मस्ती आहे. छत्रपती संभाजी नगरमध्ये हेलिकॉप्टरने पैसे आले. पोलीस आयुक्तांनी त्याकडे लक्ष दिलं नाही. लोकसभेला पैशांचा वापर करुन मला पाडण्यात आलं. हे सगळं असलं तरीही लोक चिडले आहेत. उद्धव ठाकरेंचं वलय, शरद पवारांचं वलय आहे त्यातून ही विधानसभेची जागा आम्ही जिंकू शकतो. कन्नड, विजापूर, गंगापूर या जागाही जिंकायच्या आहेत.' असंही चंद्रकांत खैरे म्हणाले. काही वेळापूर्वीच त्यांनी एबीपी माझाशी संवाद साधला. त्यावेळी चंद्रकांत खैरेंनी हे वक्तव्य केलं आहे. संजय शिरसाट यांना पाडण्यासाठी तुम्हाला छत्रपती संभाजी नगर पश्चिम ही जागा तुम्ही लढवणार का? असं विचारलं असता चंद्रकांत खैरे ( ण्र्ह्रिव्हू खुँग ) म्हणाले, 'मला जर उद्धव ठाकरेंनी आदेश दिला तर मी नक्की विधानसभा निवडणूक लढवेन. बाहेरच्या कुणाला तिकीट देण्याऐवजी आपला माणूस तिकडे नाही का? हे पाहिलं जाईल. मी एकनिष्ठ आहे आणि तो गद्दार आहे. एकनिष्ठ गद्दाराला पाडू शकतो. राजू शिंदे आमच्या पक्षात आले त्याबद्दल अंबादास दानवेंनी मला सांगितलं नाही. मी प्रवेश घेताना त्याला व्यासपीठावर पाहिलं. राजू शिंदेंनी मला पाडलं. जे उद्धव ठाकरेंना मनाला लागलं आहे.



# अतिवृष्टीने जोर खोऱ्याचा वाई तालुक्याशी संपर्क तुटला; रस्ते, शेती गेली वाहून, जनजीवन विस्कळीत

■ **सातारा : यश सावंत**

मागील काही दिवसांत जोर खोऱ्यात झालेल्या अतिवृष्टीने रस्ते, शेती वाहून गेल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. वाई तालुक्याचा जनसंपर्क तुटला आहे. जोर गोळेवाडी जाधव वस्ती व इतर पश्चिम भागांतील रस्त्यांची युद्धपातळीवर मोठ मोठ्या यंत्रसामुग्रीद्वारे रस्ते दुरुस्तीला सुरूवात करण्यात आली आहे. मुसळधार पावसामुळे जोर गोळेवाडी जाधव वस्ती व इतर पश्चिम भागातील रस्त्यांची अवस्था फार भयावह झाली आहे. काही घरांचेही नुकसान झाले आहे.



अवस्था फार भयावह झाली आहे. आमदार मकरंद पाटील यांनी सर्व यंत्रणांना परिस्थिती हाताळण्याच्या सूचना दिल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम आणि जलसंपदा विभागाकडून भर पावसात युद्धपातळीवर रस्ते दुरुस्तीला सुरूवात झाली आहे.

मागील काही दिवसांत झालेल्या जोरदार अतिवृष्टीने जोर खोऱ्यातील रस्ते वाहून गेले. जनजीवन विस्कळीत झाले. रस्ते भात, नाचणीची शेतेही वाहून गेली. यामुळे या परिसराचा वाई तालुक्याशी जनसंपर्क तुटला. सार्वजनिक बांधकाम आणि जलसंपदा विभागाकडून भर पावसात त्यामुळे या भागाचा वाई तालुक्यातील संपर्क तुटलेला आहे.

आमदार मकरंद पाटील, प्रांताधिकारी राजेंद्र जाधव, तहसीलदार सोनाली मेटकरी, गटविकास अधिकारी विजय परीट, आरोग्य अधिकारी संदीप यादव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे महेश गोंजारी व जलसंपदा विभागाला ताबडतोबिने परिस्थिती नियंत्रणात आणण्याच्या सूचना दिल्या आहेत. तात्काळ या गावांचा वाई तालुक्याशी संपर्क जोडून देण्याची सूचना केली आहे. आमदार पाटील रविवारी या भागाचा दौरा करणार आहेत.

# 'मला माझ्या बोटावर विश्वास, माझं बोट कोणाच्याही हातात देत नाही', शरद पवारांकडून मोदींची फिरकी

■ **मुंबई : गणेश बागडे**

'शरद पवारांचं बोट धरून राजकारणात आलो' असं वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही वर्षांपूर्वी केलं होतं. मोदींच्या या वक्तव्याची फिरकी घेत शरद पवार म्हणाले, 'मला माझ्या बोटावर पूर्ण विश्वास आहे, मी ते कोणाच्याही हाती देत नाही.' मोदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमधील अनेक नेते शरद पवारांना राजकारणातील गुरू मानतात. त्यांचं राजकारणात येण्याचं व यशाचं श्रेय ते शरद पवारांना देतात. मात्र शरद पवारांनी पूर्वी त्यांच्याबरोबर असलेल्या आणि आता विरोधात बसलेल्या राष्ट्रवादीच्या नेत्यांनाही चिमटा काढला आहे. शरद पवारांचा रोख मोदींसह उपमुख्यमंत्री अजित पवारांकडेही असावा असं बोललं जात आहे.

शरद पवार म्हणाले, 'पंतप्रधानांनी मागे म्हटलं होतं की मी शरद पवारांचं बोट धरून राजकारणात आलो, त्यांचं ते वक्तव्य मी अजिबात मान्य करत नाही. नरेंद्र मोदी एका भाषणात म्हणाले होते की शरद पवार यांचं बोट धरून मी राजकारणात आलो आणि इथवर पोहोचलो. मोदी तसं बोलल्यापासून मी कोणालाही माझं बोट धरायला देत नाही. मला माझ्या बोटावर पूर्ण विश्वास आहे. मी माझं बोट कोणाच्याही हातात देणार नाही.'दरम्यान, शरद पवार यांनी यावेळी गृहमंत्री अमित शाह यांच्या टीकेलाही प्रत्युत्तर दिलं. अमित शाह यांनी शरद पवार यांचा 'भ्रष्टाचारी लोकांचे म्होरके' असा उल्लेख केला होता. यावर शरद पवार म्हणाले, 'सर्वोच्च न्यायालयाने तडीपार केलेला माणूस आज देशाचा गृहमंत्री आहे.' 'महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराला शरद पवारांनीच संस्थात्मक स्वरूप दिलं. ते भ्रष्टाचारी लोकांचे म्होरके आहेत, असं अमित शाह म्हणाले होते. त्यावर शरद पवार यांनी आज (२६ जुलै) प्रतिक्रिया दिली. शरद पवार म्हणाले, 'मागे एकदा अमित शाह म्हणाले की शरद पवार भ्रष्टाचारी लोकांचे सुभेदार आहेत. परंतु, देशाच्या गृहमंत्रिपदावर बसलेल्या या माणसाला देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने त्याच्या राज्यातून तडीपार केलं होतं. अमित शाह हे जेव्हा गुजरातमध्ये मंत्री होते. तेव्हा त्यांनी कायद्याचा चुकीच्या पद्धतीने वापर केला होता. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने त्यांना राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखली जावी म्हणून गुजरातमधून तडीपार केलं होतं. तो माणूस आता देशाचा गृहमंत्री बनला आहे आणि देशाचं संरक्षण करण्याची जबाबदारी घेऊन अशी वक्तव्ये करत आहे.'



# दरड - पुराचा धोका लक्षात घेता सातारा जिल्ह्यात ७०० लोकांचे स्थलांतर

■ **सातारा : विशाल कारंडे**

साताऱ्यात धरण क्षेत्रातील पावसाचा जोर व आवकमध्ये घट झालेली आहे.धोम धरण व उरमोडीतून नदी पात्रात विसर्ग सोडवण्याचे नियोजन पावसाचे प्रमाण व तीव्रता लक्षात घेता पुन्हा आढावा घेऊन करण्यात येणार आहे. विसर्ग सोडणे आवश्यक असलेल्या बाबत आगाऊ सुचना देण्यात येईल.

धोम धरणाची पाणी पातळी ७४२.२९ मीटर आहे व एकूण पाणी साठा ७०.९टक्के आहे. कण्हेर धरण पाणलोट क्षेत्रात धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी पाण्याचा विसग.र्दहा हजार क्युसेक्स वरुन कमी करुन एकूण विसर्ग ५५०० क्युसेक्स करणेत आला आहे.हा विसर्ग आवकनुसार त्यामध्ये कमी जास्त करणेत येईल.कृष्णा,वेण्णा नदीच्या पाणीपातळीत वाढ होणार असलेने नदी पात्राजवळील नागरिकांना



सतर्कतेचा इशारा कार्यकारी अभियंता सिंचन विभाग , सातारा यांनी दिला आहे. बोपर्डी येथे गाढवे यांच्या घराची भिंत कोसळली. कुसुंबी केळघर रस्त्यावर गरड कोसळल्यामुळे वाहतूक ठप्प झाली आहे. महाबळेश्वर येथे घरांची पडझड झाली आहे. आज जिल्ह्यातील सर्व शाळा बंद होत्या.भैरवगड घाटातील दरड काढण्यात येत आहे. ठोसेघर घाटातील रस्ता खचल्याने या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. मौजे बोंडारवाडी येथे अतिवृष्टीमुळे भुस्खलन होऊन मोठ्या प्रमाणात भराव वाहून गेला आहे पाण्याची पाइपलाइन तुटली आहे.त्यामुळे गावचा पाणीपुरवठा बंद आहे. जिल्ह्यात पावसाचा जोर कमी झाला असला तरी संभाव्य धोका टाळण्यासाठी पूरप्रवण व दरडग्रस्त महाबळेश्वर जावळी पाटण तालुक्यातील सुमारे सातशे लोकांचे स्थलांतर करण्यात आले आहे. कण्हेर आणि वीर धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाल्याने लोकांना सतर्क राहण्याचा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिल्या आहेत.ते सर्व परिस्थितीवर लक्ष ठेऊन आहेत.

जिल्ह्यात सरासरी ४३.९ मि. मी. पावसाची नोंद झाली आहे.दि १ जून पासून आतापर्यंत एकूण सरासरी६३६.५मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. तालुका निहाय पावसाची आकडेवारी मि.मी. मध्ये असून (कंसातील आकडे आतापर्यंतच्या एकूण पावसाचे) सातारा ४८.२ (५६८.६), जावली-मेढा ९९ (१११०.१), पाटण ४०.७ (९४२.३), कराड २६.९(५८३.१), कोरेगाव४६.८ (४८४.२), खटाव – वडूज २३.१ (३७१), प्रमाणे पाऊस झाला आहे.

# वित्त विभागाच्या मंजुरीनंतरच 'लाडकी बहीण'ची घोषणा; उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्पष्टीकरण

■ **मुंबई : गणेश बागडे**

**'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'साठी चालू आर्थिक वर्षात ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून वित्त विभागाच्या संमतीनंतरच या योजनेला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी शनिवारी 'एक्स' समाजमाध्यमावर दिली.**

राज्यातील माता-भगिनी-मुलींच्या आर्थिक स्वातंत्र्य, स्वावलंबन, पोषण व सर्वांगीण सक्षमीकरणासाठी, मान, सन्मान, स्वाभिमान वाढवण्यासाठी ही रक्कम खर्च करण्याची राज्य सरकारची तयारी आहे. त्यामुळे या योजनेला कुणाचा विरोध असण्याचे कारण नाही, असा खुलासा पवार यांनी केला. नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात अजित पवार यांनी २०२४-२५ या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करताना 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' घोषित केली. या योजनेनुसार पात्र लाभार्थी महिलेच्या बँक खात्यात महिना १ हजार ५०० रुपये जमा होणार आहेत. या योजनेसाठी वर्षाला अंदाजे ४६ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. खर्चाचा हा बोजा सरकारी तिजोरीला सहन करणे शक्य नसल्याने वित्त विभागाचा या योजनेला विरोध असल्याची चर्चा आहे. 'लाडकी बहीण', 'लाडका भाऊ' या योजनांची अंमलबजावणी निवडणुकीपूर्वी एखादा हप्ता देण्यापुरती असेल. पण अशा



अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'रेवडी' ही संकल्पना मांडली होती. आता त्यांनी या योजनांबाबतही त्यांची भूमिका स्पष्ट करावी, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार ) अध्यक्ष शरद पवार यांनी या योजनांची खिल्ली उडवली. 'भ्रष्टाचाराचे सुभेदार' अशी टीका शरद पवार यांच्यावर केल्यानंतर अमित शहा यांना गुजरातमध्ये असताना सर्वोच्च न्यायालयाने तडीपार केले होते. अशी माणसे आता गृहमंत्री होत आहेत, असे म्हणत पलटवार केला होता. या टीकेवर चंद्रशेखर बावनकुळे यांनी सूर्याला दिवा दाखविण्यासारखे आहे अशी प्रतिक्रिया दिली होती. बावनकुळेच्या या प्रतिक्रियेवर शरद पवार मिश्कीलपणे म्हणाले, 'तो दिवा आम्ही महाराष्ट्राच्या जेलमध्ये बघितला आहे.' मराठा आरक्षणाच्या मागणीमुळे मराठा- ओबीसीमध्ये निर्माण होणारी तेढ हे काळजीचे कारण आहे.


**महाराष्ट्र शासन**

**इलाखा शहर विभाग, (सा.बां.)**

**ई -निविदा सुचना क्र. ३ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. लक्ष |
|---|---|---|
| १ | एन. डी. रोड मुंबई येथील अंबर फ्लॅट नं. २८ येथे प्रसाधनगृह बाथ, दरवाजे, खिडक्या, शटर, किचन ट्रॉली, प्लॅटफॉर्म, फ्लोरींग, प्लास्टर इ. नुतनीकरण व दुरूस्ती करणे. | २१.०७ |
| २ | जी. जे. भोसले मार्ग मुंबई सुनिती इमारत ७ मजल्यावरील फ्लॅट क्र. १३ येथे दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | २४.८३ |
| ३ | चर्चगेट मुंबई येथील शासकीय इमारत सागर सदनिका-३९ मध्ये दरवाजे, खिडक्या, स्टोरेज, युनिट, प्रसाधनगृह, किचन ओटा नुतनीकरण, प्लास्टर आणि रंगकाम करणे. | ९.६५ |
| ४ | बेल हेवन मुंबई येथील फ्लॅट वॉल सिलिंग प्लास्टर व नुतनीकरण करणे. | १६.२४ |
| ५ | जी. जे. भोसले मार्ग मुंबई सुनिती इमारत ७ मजल्यावरील फ्लॅट क्र. १३ येथे प्रसाधनगृह दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | २५.०३ |
| ६ | चर्चगेट मुंबई येथील यशोधन इमारत पूर्व बाजूस नविन कंपाऊंड वॉल ग्रेनाईट चे बांधकाम करणे. | २३.९७ |
| ७ | चर्चगट मुंबई येथील यशोधन इमारतीच्या सदानिका-३२ मध्ये दुरूस्ती, रंगकाम करणे. | १६.४८ |
| ८ | चर्चगट मुंबई येथील आसावरी इमारतीमध्ये सदनिका दुरूस्ती, रंगकाम करणे. | १६.८१ |
| ९ | जी. जे. भोसले मार्ग मुंबई सुरूची इमारत फ्लॅट क्र. ३ येथे फर्निचरची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | १९.८३ |
| १० | जी. जे. भोसले मार्ग मुंबई सुरूची इमारत फ्लॅट क्र. ३ येथे रूमची फ्लोरींग दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | १९.८७ |
| ११ | पोलीस आयुक्त कार्यालय मुंबई येथील सी - ब्लॉक येथे बाथ, टेरेस, वॉटर प्रूफिंग, फ्लोरींग, प्रसाधनगृह दरवाजे, खिडक्या, किचन प्लॅटफॉर्म दुरूस्ती करणे. | २४.५८ |
| १२ | पीकेट रोड मुंबई येथील स्टोन बिल्डींग येथे बाथ, फ्लोरींग, प्रसाधनगृह, दरवाजे, खिडक्या, किचन प्लॅटफॉर्म येथे दुरूस्ती करणे. | २४.८२ |
| १३ | जी. जे. भोसले मार्ग मुंबई सुरूची इमारत फ्लॅट क्र. ३ येथे प्रसाधनगृहाची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | १९.८६ |
| १४ | चर्चगट मुंबई येथील यशोधन इमारत ए आणि बी टाईप सदानिका दुरूस्ती आणि रंगकाम करणे. | १९.११ |
| १५ | एल. टी. मार्ग मुंबई येथील बीएमसी मुख्य लाईन येथे ए आणि बी ब्लॉक कॉन्स्टेबल क्वार्टर्स येथे नुतनीकरण करणे. | २४.९४ |
| १६ | चर्चगेट मुंबई येथील आसावरी इमारत नं. ६०४, ४०२,२०१ येथे दुरूस्ती करणे. | १२.९७ |
| १७ | बेल हेवन इमारत मुंबई येथील ९ मजल्यावरील सदनिका २८ येथे नुतनीकरण करणे. | १६.८६ |
| १८ | एन.डी.रोड मुंबई येथील निलीमा इमारत बी विंग मधील ८ ते १५ मजल्यावरील सदनिकांचे अंतर्गत प्लस्टर व रंगकाम करणे. | १९.९५ |
| १९ | एन.डी.रोड मुंबई येथील निलीमा इमारत ए विंग मधील १ ते ७ मजल्यावरील सदनिकांचे अंतर्गत प्लस्टर व रंगकाम करणे. | १९.९१ |
| २० | बेल हेवन इमारत येथील ६ ते १० मजल्यावरील सदनिकांचे अंतर्गत प्लास्टर व रंगकाम करणे. | १९.९७ |
| २१ | एन.डी.रोड मुंबई येथील निलीमा इमारत येथील सदनिका मधील बालकीमध्ये रेलिंग कडक काच दुरूस्ती करणे | १६.८४ |
| २२ | एन.डी.रोड मुंबई रॉकी हिल टॉवर येथील विविध सदनिकांमध्ये शुज रॅक, टी.व्ही.युनिट पॅनलिंग लॅमीनेटेड कव्हरींग, स्टोरेज युनिट दुरूस्ती करणे. | १६.८३ |
| २३ | चर्चगट मुंबई येथील यशोधन इमारती रूम नं.१७ येथे दुरूस्ती करणे. | १९.९९ |
| २४ | एन.डी.रोड मुंबई येथील शासकीय बंगला देवगीरी येथे वॉर रूम ऑफिस बिल्डिंग आणि व्ही.आय गेस्ट रूम ची दुरूस्ती आणि बांधकाम करणे. | ८३.१६ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. २६.७.२०२४ ते दि. ९.८.२०२४ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. १२.८.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्र. इशवि/निलि/ ९८९९
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : १८/७/२०२४

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१२५४

# राज्यात २०१९ ते २०२१ या काळात एक लाख महिला बेपत्ता, त्यांचा शोध घेण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात याचिका

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

**राज्यात २०१९ ते २०२१ या कालावधीत सुमारे एक लाख महिला बेपत्ता झाल्या आहेत, असा दावा करणारी जनहित याचिका उच्च न्यायालयात करण्यात आली आहे. तसेच, या महिलांचा शोध घेण्यासाठी प्रभावी यंत्रणा स्थापन करण्याचे आदेश पोलिसांना द्यावेत, अशी मागणीही याचिकाकर्त्याने केली आहे.**

सरकारच्या कोषागार विभागात काम करणाऱ्या शहाजी जगताप या सांगलीतील माजी सैनिकाने ही जनहित याचिका केली आहे. जगताप यांची मुलगी विज्ञान शाखेच्या तिसऱ्या वर्षाला शिकत असताना डिसेंबर २०२१ मध्ये बेपत्ता झाली. जगताप यांनी सांगलीतील संजय नगर पोलीस ठाण्यात मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. मात्र, पोलीस त्यांच्या मुलीचा शोध घेऊ शकलेले नाहीत. मुलीचा शोध घेत असताना तिने इस्लाम धर्म स्वीकारून लग्न केल्याची माहिती आपल्याला मिळाली. आपण मुलीला केवळ दोन मिनिटांसाठी भेटलो. परंतु, त्यानंतर आजपर्यंत ती कुठे आहे आणि तिने कुटुंबीयांशी संबंध का तोडले हे माहीत नसल्याचेही जगताप यांनी याचिकेत म्हटले आहे.

मुलगी सज्ञान असल्यामुळेच पोलीस तिला घरी आणण्यासाठी कोणतेही प्रयत्न करीत नाहीत. मुलीला तिचे जीवन तिला हवे तसे जगायचे असल्याचेही आपल्याला कळले आहे. परंतु, तिचा शोध घेताना गेल्या काही वर्षांत आपल्या कुटुंबावर खूप आघात झाले आहेत आणि कुटुंब त्रासाला सामोरे जात आहे, असा दावाही जगताप यांनी याचिकेत केला आहे.




दरम्यान, याच काळात आपल्याला गृह मंत्रालयाने प्रसिद्ध केलेली माहिती मिळाली. त्यानुसार, राज्यात १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या स्त्रिया वर्षानुवर्षे सापडलेल्या नाहीत. आकडेवारीनुसार, २०१९ मध्ये ३५ हजार ९९०, २०२० मध्ये ३० हजार ०८९ आणि २०२१ मध्ये ३४ हजार ७६३ महिला बेपत्ता झाल्याची आणि अद्याप त्यांचा शोध लागलेला नसल्याची नोंद झाल्याचे याचिकाकर्त्याने याचिकेत म्हटले आहे. महिला बेपत्ता होण्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही, असा आरोप याचिकाकर्त्याने वकील मंजिरी पारसनीस यांच्यामार्फत दाखल केलेल्या याचिकेत केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने २००२ मध्ये या मुद्द्यावर काही आदेश दिले होते, परंतु, त्यानंतरही या समस्येबाबत अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन अत्यंत बेफिकीर आणि निष्काळजी असल्याचा दावाही याचिकाकर्त्याने केला आहे.

## घरफोडीची फिर्याद देणाराच जेव्हा निघतो चोर...!

■ **सांगली : विशेष प्रतिनिधी**

घरात ठेवलेल्या १५ लाख रुपयांची चोरी झाल्याची फिर्याद देणारा फिर्यादीच चोर निघाल्याची घटना वांगी (ता. कडेगाव) येथील पोलीस तपासात रविवारी उघड झाली. या प्रकरणी किरण कुंभार याला अटक करण्यात आली आहे. न झालेल्या घरफोडीच्या या फिर्यादीच्या निमित्ताने मात्र एक वेगळीच कहाणी समोर आली. वांगी गावातील सुतारमळा येथे घरफोडीत १५ लाख २० हजार रुपये चोरीस गेल्याचा गुन्हा चिंचणी वांगी पोलीस ठाणे हद्दीत दाखल करण्यात आला होता. त्यावरून पोलीस निरीक्षक सतीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक नितीन सावंत व कर्मचाऱ्यांनी या गुन्ह्याचा तपास सुरू केला. तपास करताना, त्यांच्या पथकाला माहिती मिळाली, की या गुन्ह्यात



फिर्यादीने घरफोडीचा बनाव रचला आहे.

पोलीस पथकाने मग फिर्यादी किरण कुंभार याच्याकडे सखोल तपास केला. पोलिसी खाक्या दाखविल्यावर त्याने बनाव रचल्याचे कबूल केले. त्याने रक्कम घरातच लपवून ठेवल्याची माहिती दिली. मात्र, जेवढी रक्कम चोरीला गेल्याची फिर्याद होती, त्यापेक्षा ही रक्कम कमी होती. एक तर मुळात घरीच रक्कम लपवून ठेवायची होती, तर घरफोडीचा बनाव का रचला आणि जेवढी रक्कम चोरीला गेली, त्यापेक्षा लपवलेली रक्कम कमी कशी, असा साहजिकच प्रश्न उपस्थित झाला. त्याबद्दल पोलिसांनी कुंभारला विचारले असता, एक वेगळीच कहाणी पुढे आली. जी रक्कम, म्हणजे १५ लाख रुपये चोरीस गेल्याचा बनाव रचला गेला, ती मुळात कुंभार याची नव्हतीच. ती त्याला त्याच्या भाच्याने विश्वासाने काही दिवसांकरिता ठेवायला दिली होती. परंतु, त्यातील काही रक्कम, म्हणजे सुमारे पाच लाख रुपये कुंभार याने स्वतःसाठी खर्च केली. आता सगळी रक्कम परत मागितली, तर ती कमी भरणार हे उघड होते. ही लबाडी उघडी पडू नये आणि उलट उरलेली रक्कमही आपल्यालाच वापरायला मिळावी, या हेतूने कुंभार याने बनाव रचला. त्यानुसार, त्याने १० लाख रुपये स्वतःच्याच घरी लपवून ठेवले आणि कपाटातील साहित्य अस्ताव्यस्त करून घरफोडी झाल्याचा बहाणा केला. तक्रार करताना १५ लाख २० हजार रुपये चोरीस गेल्याची तक्रारही केली.

## पोलिसांचा ससेमिरा चुकविताना वाळू वाहतुकीचे वाहन पालथे; तरुणाचा मृत्यू, तिघे जखमी

■ **सोलापूर: विशेष प्रतिनिधी**

मंगळवेढा तालुक्यात माण नदीच्या पात्रातून अवैध वाळू तस्करी करणारे टाटा इन्ट्रा मालवाहतूक वाहन पोलिसांना पाहताच वेगाने दामटत पळून जाताना पालथे झाले. या दुर्घटनेत एका तरुणाचा मृत्यू झाला. तर तिघे जखमी झाले. मंगळवेढा तालुक्यातील उचेठाण शिवारात दुपारी घडलेली दुर्घटना सहा दिवसांनी उजेडात आली आहे. यात पोलिसांची भूमिका संशयास्पद असल्याचा आरोप होत आहे. दरम्यान, याप्रकरणी मृतासह वाहनचालक व वाहनमालक आणि अन्य दोघांविरुद्ध मंगळवेढा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

देवल शक्तिमान उघडे (रा. शिरगाव, ता. पंढरपूर) असे मृताचे नाव आहे. जखमींमध्ये



वाहनचालक सूरज शहाजी चव्हाण (रा. सांगोला) याच्यासह वाहनात वाळू भरून पाठीमागे बसलेले गणेश भाऊसाहेब मस्के व गणेश दत्तात्रय मस्के (रा. शिरगाव) यांचा समावेश आहे. यातील एकाची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले गेले. या मृत देवल उघडे हासुद्धा वाहनात वाळू भरून पाठीमागे बसला होता. या चौघांसह वाहनमालक चैतन्य सुभाष गायकवाड (रा. ओझेवाडी, ता. पंढरपूर) यास आरोपी करण्यात आले आहे.

याबाबत मंगळवेढा पोलीस ठाण्यातील पोलीस नाईक ईश्वर धुमाळ हे पोलीस निरीक्षक यांच्या आदेशानुसार अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी गस्त घालत दुपारी चारच्या सुमारास उचेठाण परिसरात आले होते. तेव्हा मुडवी येथून माण नदीतून अवैध वाळू भरून येणारे टाटा ईन्ट्रा मालवाहतूक करणारे चारचाकी वाहन दिसून आले. त्यास थांबण्याचा इशारा केला असता कारवाई टाळण्यासाठी, जागेवर न थांबता तशाच भरधाव वेगाने वाहन जात होते. त्यामुळे पोलीस नाउक धुमाळ यांनी पाठलाग केला असता पुढे काही अंतरावर वाहन पालथे झाले. यात एकाचा मृत्यू तर अन्य तिघे जखमी झाले.

## आंतरराष्ट्रीय टूर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स कंपनीची माजी कर्मचाऱ्याविरोधात तक्रार, १ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय टूर्स अॅण्ड ट्रॅव्हल कंपनी थॉमस कूक इंडिया लिमिटेडने सुमारे एक कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी माजी सहाय्यक व्यवस्थापकाविरोधात अंधेरी एमआयडीसी पोलिसांकडे तक्रार केली आहे. एमआयडीसी पोलिसांनी याप्रकरणी बुधवारी गुन्हा दाखल केला. कंपनीच्या वतीने सुहेल शेख यांनी पोलिसांकडे तक्रार केली. आरोपी माजी कर्मचारी नागेश संतोष राव २०१६ ते फेब्रुवारी २०२३ या कालावधीत कंपनीत कामाला होते. ते कंपनीस सहयोगी उपाध्यक्ष पदावर कार्यरत होते. इम्प्लांट (कंपनीच्या मोठ्या व्यावसायिक ग्राहकांसाठी नियुक्त केलेला अधिकारी) म्हणून त्याची नियुक्ती करण्यात आली होती. संबंधित अधिकारी ग्राहक कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी सर्व विमान व इतर नोंदणीबाबतचे व्यवहार हाताळतात.




पोलीस तक्रारीनुसार, थॉमस कूक इंडिया लिमिटेडने जून २०२३ मध्ये ग्राहकाला व्हाउचर पाठवले. ग्राहक कंपनीने त्यांना २५० विमान तिकीटे व ३५ पावत्यांवरील व्यवहर असे एकूण ९४ लाख सात हजारांची नोंदणी त्यांनी केली नाही. असे सांगून त्यांनी रक्कम देण्यास नकार दिला. त्यानंतर, थॉमस कूक इंडियाच्या ऑडिट, क्रेडिट कंट्रोल आणि कलेक्शन पथकाने कागदोपत्री तपासणी केली. त्यावेळी संबंधित नोंदणी नागेश राव याने ग्राहक कंपनीच्या कर्मचाऱ्याच्या युनिक आयडीचा वापर करून तयार केलेल्या बोगस प्रोफाइलद्वारे केल्याचे निष्पन्न झाले. त्यासाठी बनावट पावत्याही सादर करण्यात आल्या. नोंदणी करताना राव यांचा स्वतःचा क्रमांकही टाकण्यात आला होता.

राव यांनी केलेल्या अनियमिततेबाबतची माहिती लेखापरीक्षण अहवालामुळे कंपनीच्या लक्षात आली. त्यावेळी कंपनीने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली. त्यावेळी त्यांनी वरिष्ठांसमोर आपली चूक कबूल केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. राव यांनी मेहुण्यासोबत स्वतःची कंपनी स्थापन केली होती. त्याद्वारे हा गैरव्यवहार झाल्याचा संशय आहे.

## विरारच्या चिखलडोंगरी गावात पुन्हा जात पंचायतीची दहशत, महिलेला जमावाची मारहाण

■ **वसई: विशेष प्रतिनिधी**

विरारच्या चिखलडोंगरी गावात पुन्हा एकदा जातपंचायतीची दहशत सुरू झाली आहे. गावातील देवेंद्र राऊत यांच्या आजीचा दशक्रिया विधी गावाने उधळून लावला. यावेळी विधी करण्यासाठी आलेल्या गुरूजींच्या मुलीला जातपंचायतीच्या लोकांनी मारहाण करत शिवीगाळ केली. विशेष म्हणजे पोलिसांना याची लेखी सूचना देऊनही उपाययोजना केली नव्हती. महिलेला मारहाण होऊन केवळ अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विरारच्या चिखलडोंगरी गावात स्वांतत्र्यानंतरही जात पंचायतीची प्रथा सुरू होती. मागील वर्षी 'लोकसत्ता'ने हे प्रकरण उघडकीस आणल्यानंतर तहसीलदार आणि पोलिसांनी ही प्रथा बरखास्त केली. मात्र आता पुन्हा जातपंचायत डोके वर काढू लागली आहे. गावातील एक रहिवाशी देवेंद्र राऊत (४०) यांना




त्यांच्या आजीची दशक्रिया विधी करायची होती. मात्र चंद्रकात खरे या गुरूजींच्या हातून विधी करण्यासाठी गावातील एका गटाने विरोध करत दमदाटी केली होती. हा गट पूर्वी जातपंचायतीमध्ये सक्रिय होता. त्याबाबत शनिवार २० जुलै रोजी राऊत यांनी अर्नाळा सागरी पोलिसांना लेखी अर्ज करून जीवितास धोका असल्याचेही सांगितले होते.

## जमावाच्या हल्ल्यात शिवसेना नेत्याच्या मुलाचा मृत्यू

■ **वसई: विशेष प्रतिनिधी**

रिक्षा चालकाशी झालेल्या वादामध्ये एका इसमावर जमावाने हल्ला केला. त्यानंतर अचानक त्यांना हृदविकाराचा झटका आला. त्यात त्यांचा मृत्यू झाला मिलिंद मोरे असे त्यांचे नाव असून ते ठाण्याचे माजी जिल्हाप्रमुख रघुनाथ मोरे यांचे पुत्र आहेत. रविवारी विरारच्या नवापूर येथील एका रिसॉर्ट समोर ही घटना घडली. ठाण्यात राहणारे मिलिंद मोरे (४७) हे आपल्या कुटुंबासह रविवारी विरारच्या नवापूर येचीतर सेव्हन सी बीच रिसॉर्ट येथे सहलीसाठी आले. यावेळी रिसॉर्ट बाहेरच एका रिक्षाचालकाने मौरे यांच्या पुतण्याला धडक दिली. यामुळे मोरे कुटुंबीयांचा त्या रिक्षा चालकासोबत वाद झाला.

## २५ महिलांशी लग्न करुन फसवणूक करणाऱ्या 'लखोबा लोखंडेला' बेड्या

■ **वसई: विशेष प्रतिनिधी**


ऑनलाईन फसवणूकीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असलेली पाहायला मिळत आहे. सर्व काही ऑनलाईन उपलब्ध झाल्यामुळे त्याचा चुकीच्या गोष्टींसाठीही वापर केला जातोय. ऑनलाईन फसवणुक करताना भावनांशी



खेळत फ्रॉड केले जात असल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहे. अशातच एकाने तब्बल २५ महिलांसोबत लग्न करत त्यांची आर्थिक फसवणुक केल्याचं प्रकरण समोर आलंय. लग्नाचं आमिष दाखवत आरोपीने महिलांकडून लाखो रूपयांना गंडा घातला. महिलांसोबतस ओळख करण्यासाठी आरोपी शादी डॉट कॉम अॅपचा वापर करत होता. शादी डॉट कॉम या अॅपवर फिरोज नियाज शेख (वय ४३) महिलांसोबत ओळख करायचा. महिला अशा निवडायचा ज्या विधवा किंवा परितत्त्या आहेत अशांना तो हेरायचा. थोडे दिवस बोलून त्यांचा विश्वास संपादित करायचा. ओळखीचं रूपांतर हळूहळू प्रेमात करत अशा महिलांना पुन्हा नव्याने आयुष्य सुरू करण्याची खोटी आश्वासने द्यायाचा. इतकंच नाहीतर महिलांसोबत तो लग्नही करायचा अशा त्याने आतापर्यंत २५ लग्न केली आहेत.

## बेवारस मृतदेह

अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र.४०/२०२४ कलम- १७४ फौ.दं.प्र.संहिता १९७३ अन्वये अनोळखी बेवारस



इसम वय अंदाजे- ५० ते ५४ वर्षे, बांधा- सडपातळ, रंग-सावळा, उंची- अंदाजे ५ '८'इंच, नेसणीस निळ्या रंगाचा शर्ट, पिवळ्या रंगाची हाफ पॅन्ट असलेला इसम नवीन नागरदास रोड, अंधेरी पूर्व येथे मिळून आला असून उपचाराकामी कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी दाखलपूर्व मयत घोषित केले. नमूद इसमाचे नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यात खालील नंबरवर संपर्क करावा.

**संपर्क-**
**श्री.अरविंद पवार, पोलीस उपनिरीक्षक**
**अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ८६९२०००७७७**
**पोलीस ठाणे क्रमांक : ०२२२६८३१५६२**

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग,
राज्य कामगार विमा योजना रूग्णालय आवार, लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुलूंड (प), मुंबई-४०००८०
ई-मेल पत्ता :- elnorthmumbai.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी क्रमांक :-०२२-२५६०१३२७
ई-निविदा सुचना क्र.०९/२०२४-२५

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलूंड, मुंबई हे महाराष्ट्र शासनाकडील विद्युत ठेकेदार (लिफाफा क्र.१ अनुसार) यांचे कडून खालील कामाकरिता ब-१ टक्के वारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| कामाचे नांव : | निविदा रक्कम रूपये : |
|---|---|
| 1. अंदाजपत्रक क्र. एटीएल / एइएसडी / एडीआर/२४४०६/२०२४-२५ अंधेरी उपविभाग मुंबई येथील निवासी इमारतीमधील विद्युत संच माडणीची देखभाल व दुरुस्ती करीता 6 महिन्याच्या कामासाठी तात्पुरती 2 तारतंत्री आणि 2 मजदूर यांची निमणूक करण्याबाबत | रुपये ५६९०८८/- |
| 2.. अंदाजपत्रक क्र.अटल/एनएमईडी/बीईएसडी/बीएनडी/२३१६०/२०२३-२४,वांद्रे (पूर्व) मुंबई येथील शासकीय तंत्रनिकेतन इमारतीत (तळमजला + ४ मजला) उदवाहनांना संपूर्ण देखभाल दुरुस्ती प्रदान करणे . | रुपये ७८९८१६ /- |
| 3 . अंदाजपत्रक क्र.एसडीआर/बीईएसडी/बीएनडी/२४११२/२०२४-२५,वाय-३, वाय-६, वाय - 10 , वाय- 12 च्या मागील बाजूस खराब झालेल्या गंजलेल्या मीटर केबिनचे नूतनीकरण करणे , शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०००५१. | रुपये ७९२४७२ /- |
| ४. अंदाजपत्रक क्र.ओडब्लू/बीईएसडी/बीकेसी/२४३१४/२०२४-२५,पोलीस प्रशिक्षण केंद्र कोल कल्याण कलिना सांताक्रूझ पूर्व मुंबई ५५ येथे जुने व नादुरुस्त एल. ई. डी. फिटिंग्ज, सेलिंग पंखे, स्विच बोर्ड आणि अॅसेसरीजची बदली प्रदान करणे. | रुपये ६२५३२५ /- |
| ५. अंदाजपत्रक क्र.एसआर/एनएमईडी/एमईएसडी/ केआएल/२४९११/२०२४-२५ कुर्ला पूर्व मुंबई येथील नेहरूनगर पोलीस निवासी इमारत क्र.१४३, येथे स्थापत्य संरचनात्मक दुरुस्तीच्या कामामुळे विस्कळीत होणार्या अंतर्गत व बाह्य विद्युत संच मांडणी ची दुरुस्ती करणे | रुपये ६६८३१८ /- |
| ६. अंदाजपत्रक क्र.एटीएल/एडीआर/२४४०७/२०२४-२५ अंधेरी उपविभाग मुंबई मधील वांद्रे पश्चिम, अंधेरी पश्चिम, सांताक्रूझ पश्चिम, खार पश्चिम, विलेपार्ले पश्चिम या अंतर्गत अनिवासी इमारतीमधील विद्युत संच माडणीची देखभाल व दुरुस्ती करीता 6 महिन्याच्या कामासाठी तात्पुरती 3 तारतंत्री आणि 2 मजदूर यांची निमणूक करण्याबाबत | रुपये ७२५४०० /- |
| ७. अंदाजपत्रक क्र.एटीएल/एइएसडी/केडीएल/२४६१४/२०२४-२५ कांदिवली शाखा, अंधेरी उपविभाग मुंबई मधील गोरेगाव, कांदिवली, मालाड, बोरिवली येथे अनिवासी इमारतींमधील विद्युत संच माडणीची देखभाल व दुरुस्ती करीता 6 महिन्याच्या | रुपये ८१३८८८ /- |
| ८. अंदाजपत्रक क्र.एटीएल/एइएसडी/ जेजीआर/२४५१६/२०२४-२५ जोगेश्वरी शाखा, अंधेरी उपविभाग मुंबई येथे निवासी इमारतींमधील विद्युत संच माडणीची देखभाल व दुरुस्ती करीता 6 महिन्याच्या कामासाठी तात्पुरती 2 तारतंत्री आणि 2 मजदूर यांची निमणूक करण्याबाबत. | रुपये ५६९०८८/- |
| ९. अंदाजपत्रक क्र.सीआर/बीईएसडी/बीसीएन/२४२०६/२०२४-२५,शासकीय वसाहत वांद्रे (पूर्व) मुंबई - ५१ येथील ब-१५८/५, ब-८८/४, ब-८८/२, ब-१७७/१, ब-२१६/३, ब-१२८/१, ब-५४/५, ब-२१८/८, ब-१९०/४, ब-६८/५ या निवासस्थानातील स्थापत्य विभागांतर्गत छत, प्लास्टरींगची कामे सुरु असल्यामुळे विद्युतसंचमांडणी मोडकळीस आलेली असून धोकादायक स्थितीत असल्यामुळे सदर विद्युतसंचमांडणी नव्याने करणे बाबत. | रुपये ३३०७८० /- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.३०.०७.२०२४ ते दि.०७.०८.२०२४ रोजी १७.३० वा.पर्यंत.
ई निविदा उघडणे : दि.१२.०८.२०२४ रोजी १४.०० वा.नंतर.
(सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण २२,/प्र.क्र १०४/इमा-२ मंत्रालय ,मुंबई दि.२८.०६.२०२४)
खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१.वरील अंदाजित रक्कमेत जी.एस..टी. समाविष्ट नसून ठेकेदाराने निविदेत दर भरताना जी.एस..टी.वगळून दर नमूद करावा.अंदाजित रक्कमेवर नमूद केलेल्या दरानुसार आलेल्या रक्कमेवर जी.एस..टी.१८% वेगळा अदा करण्यात येईल.
डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१३५३
२.http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.)
३. कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वॉलिफी केशनचा क्रायटेरिया समाविष्ट केलेला आहे.
४. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलूंड (प), मुंबई कार्यालयातील सूचना फलक.
जा.क्र.काअ/उमुंविवि/निविदा/ १८८७ /२०२४दिनांक : १९/०७/२०२४

सही
कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई विद्युत विभाग,
सा.बां.विभाग, मुंबई.

# भारतीय राजमुद्रेचा DP ठेवून IAS असल्याचे सांगत सावकारी करणाऱ्या महिलेला अटक

■ पुणे : विशेष प्रतिनिधी

व्हॉटसअॅपचे डी पी ला आय ए एस व भारतीय राजमुद्रेचा फोटो ठेवून त्यावर IAS ऑफिसर असल्याचे भासवून सावकारी करणाऱ्या महिलेला लोणी काळभोर पोलिसांनी अटक केली आहे. दुप्पट पैसे दिल्यानंतरही अधिक पैशांसाठी सगळी सिस्टीम कामाला लावण्याची व जीवे मारण्याची धमकी तिने दिली होती. रेणुका ईश्वर करनुर (वय ३२, रा. सिद्धीविनायक सोसायटी, वडकी) असे अटक केलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत वडकी येथील एका ३१ वर्षाच्या महिलेने लोणी काळभोर पोलिसांकडे फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांनी सांगितले की फिर्यादी या घरगुती व्यवसाय करतात. त्यासाठी रेणुका करनुरे यांच्याकडे येत होत्या. त्यांनी आपण आय ए एस असल्याचे सांगितले. फिर्यादी यांना पैशांची गरज असल्याने त्यांनी रेणुकाकडून सुरुवातीला दरमहा ५ टक्के दराने ६० हजार रुपये घेतले होते. त्यानंतर त्यांनी वेळोवेळी २ लाख ६८ हजार रुपये घेतले होते. त्यावर दरमहा १० टक्के व्याजाप्रमाणे फिर्यादी यांनी आतापर्यंत एकूण ३ लाख ४८ हजार ६५० रुपये व्याज दिले. ऑनलाईन स्वरुपात दिले. ६० हजार रुपये व्याज रोख तसेच ३ लाख १० हजार रुपये वेळोवेळी १ लाख २५ हजार रुपयांची फिर्यादीची भिशीची रक्कम व २५ हजार रुपये फंडाची रक्कम दंड स्वरुपात तिला दिलेली आहे. अशाप्रकारे केवळ २ लाख ६८ हजार रुपयांपोटी त्यांनी ८ लाख ८ हजार ६५० रुपये दिलेले आहेत. असे असतानाही आणखी ४ लाख ५५ हजार ५९८ रुपये




देणे बाकी असल्याचे ती म्हणत होती. व्हॉटसअॅपवर मेसेज करुन वेळोवेळी पैशांची मागणी करुन पैसे न दिल्यास जीवे ठार मारण्याची धमकी देत होती. फिर्यादीने व्याजाचे पैसे वेळेवर दिले नाही तर प्रत्येक दिवशी ती २०० रुपये दंड घेत होती. एक महिना उशीर झाला तर केवळ दंडाचे ६ हजार रुपये वसुल करत होती. रेणुका करनुरे हिने ती रहात असलेल्या ठिकाणी आय ए एस असल्याचे सांगत होती. तिने आपल्या व्हॉटसअॅपचे डी पीला आय ए एस व भारतीय राजमुद्रेचा फोटो ठेवला आहे. पैसे न दिल्याने तिने फिर्यादीच्या पतीची कार जबरदस्तीने ओढून नेली होती. अडीच लाख रुपये दिल्यानंतर तिने ती परत केली होती. २५ जुलै रोजी रेणुका फिर्यादीच्या घरी आली. व्याजाचे पैशांची मागणी केली. व्याजाची रक्कम तुम्ही नाही दिली तर मी आयएएस पदावर आहे, हे लक्षात ठेवा. मी पूर्ण सिस्टिम हालवून सगळ्यांना पैशांच्या जोरावर मॅनेज करेल. तुझा पती ट्रक ड्रायव्हर आहे. तुझ्या पतीचा अॅक्सिडेंट करुन त्यांना कायमचे संपवून टाकू शकते, अशी धमकी दिली. त्यामुळे फिर्यादी यांनी घाबरुन पोलिसांकडे धाव घेतली. लोणी काळभोर पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करुन घेऊन रेणुका करनुरे हिला अटक करुन तिचा भंडाफोड केला आहे. तिने आणखी कोणाला व्याजाने पैसे दिले आहेत का याचा पोलीस उपनिरीक्षक अमोल घोडके तपास करीत आहे.

# भाजपच्या धमक्यांना आम्ही घाबरत नाही, अनिल देशमुख पुत्राने भाजपला सुनावले

■ नागपूर : गणेश बागडे

भाजपच्या धमक्यांना आम्ही घाबरत नाही, अनिल देशमुख यांना वैद्यकीय कारणांमुळे जामीन मिळाला नाही, त्यामुळे या कारणांवरून त्यांना पुन्हा तुरुंगात टाकण्याची मागणी करणाऱ्या भाजप नेत्यांनी प्रथम न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करावा, अशा शब्दांत माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे पुत्र व जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख यांनी सोमवारी एका पत्रकार परिषदेत भाजपला सुनावले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, तत्कालीन मंत्री आदित्य ठाकरे, शिवसेना नेते अनिल परब आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविरुद्ध खोटे आरोप असलेल्या प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करण्यासाठी दबाब टाकल्याचा आरोप अनिल देशमुख यांनी केला होता. त्याचे पुरावे 'पेन ड्राईव्ह'मध्ये असल्याचा दावाही त्यांनी माध्यमांपुढे केला होता. अनिल देशमुख हे जामीनावर आहेत. ते दोषमुक्त झालेले नाही, असे, देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होते. तोच धागा पकडून भाजपचे नेते देशमुखांवर हल्लाबोल करीत आहेत. भाजपचे विधान परिषद सदस्य परिणय फुके आणि अन्य काही नेत्यांनी अनिल देशमुख यांचा जामीन रद्द करून त्यांना तुरुंगात पाठवण्याची मागणी केली आहे. त्याला सलील देशमुख यांनी प्रतिउत्तर दिले आहे. ते म्हणाले, तीन वर्षांपूर्वी खोट्या आरोपात अनिल देशमुख यांना अटक



करण्यात आली होती. न्यायालयाने त्यांना जामीन देताना जे निरीक्षण नोंदविले आहे ते महत्त्वाचे आहे. न्यायालयाने दिलेला जामीन वैद्यकीय करणांसाठी नव्हे तर याचिकेतील गुणवत्तेवर दिला आहे. जे लोक जामीन रद्द करुन तुरुंगात टाकण्याची धमकी देत आहेत, त्यांनी आधी न्यायालयाने जामीन देताना जे निरीक्षण नोंदविले आहे त्याचा अभ्यास करावा. त्यांच्या अशा पोकळ धमक्यांना आम्ही घाबरत नाही, असे सलील देशमुख म्हणाले. अनिल देशमुख यांच्या विरोधात कोणतेही पुरावे नाहीत. त्यांच्यावर ऐकीव माहितीच्या आधारावर आरोप करण्यात आले आहेत. सर्व कागदपत्रे व जबाब ऐकल्यावर असे दिसते की, भविष्यात अनिल देशमुख या प्रकरणात दोषी ठरु शकणार नाहीत, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहेत.

# पुणे दौऱ्यानंतर राज ठाकरेंचा संताप, शिंदे, फडणवीसांना काय म्हणाले?

■ पुणे : अभिजीत येरल्लू

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे आज पुणे दौऱ्यावर आहेत. पुण्यात झालेल्या मुसळधार पावसानंतर आलेल्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी राज ठाकरेंनी पुणे दौरा केला. यानंतर राज ठाकरेंनी पत्रकार परिषद घेत पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी राज ठाकरेंनी राज्य सरकारसह पालिका प्रशासनावरही संताप व्यक्त केला. महाराष्ट्राचा कोणी



विचार करणार आहे की नाही? असा प्रश्न राज ठाकरेंनी यावेळी केला.

'पुण्यात गाड्या वाहून गेलेल्या आहेत. त्यावर विमा देणारे सांगतात की नैसर्गिक आपत्ती असेल तर आम्ही काही विमा देऊ शकत नाही. पण मग जर कोणतीही पूर्वसूचना न देता जर पाणी सोडलं असेल आणि यामुळे जर नुकसान झालं असेल तर मग राज्य सरकारने यात लक्ष देणे गरजेचे आहे. मी गेल्या अनेक वर्षापासून सांगतो की मुंबई बरबाद व्हायला वेळ लागला. पुणे बरबाद व्हायला वेळ लागणार नाही. त्याचेच हे सर्व चित्र आहे', असे राज ठाकरे म्हणाले.

# विरोधकांच्या साखर कारखान्यांची कर्जकोंडी; लोकसभा निकालानंतर राज्य सरकारचा कडू डोस

■ मुंबई : यश सावंत

लोकसभा निवडणुकीत बारामती आणि अहमदनगर लोकसभा निवडणुकीत झालेला पराभव सत्ताधाऱ्यांच्या जिव्हारी लागला असून निवडणुकीत साथ न देणाऱ्या दोन साखर कारखान्यांना केंद्राने मंजूर केलेले कर्ज रोखण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. त्याचवेळी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी बेरजेचे गणित मांडत आणखी पाच कोटी रुपयांच्या कर्ज प्रस्तावास केंद्राने काही दिवसांपूर्वी मान्यता दिली होती. त्यामध्ये भाजपचे ५, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ७ आणि कॉंग्रेस आमदाराच्या एका कारखान्याचा समावेश होता. पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून या कर्जाच्या हमीपोटी सरकारने पुरेशी वित्तीय तरतूद केल्यानंतर पात्र कारखान्यांना या कर्जाचे वितरण केले जाणार होते. मात्र लोकसभा निवडणुकीत



साखर कारखान्यांच्या ६२५ कोटींच्या मार्जिन मनी कर्जाला थकहमी देण्याचा निर्णयही सरकारने घेतला असून त्याबाबतचा प्रस्ताव बुधवारी केंद्र सरकारला पाठवला आहे. उसाच्या मळईपासून इथेनॉल निर्मितीवरील बंदी आणि साखर कारखान्यांच्या कर्ज मंजुरीस झालेला विलंब यामुळे साखर कारखानदार आणि उस उत्पादक शेतकरी यांच्या नाराजीचा फटका लोकसभा निवडणुकीत महायुतीला बसला होता.

साखर पट्यात झालेल्या पराभवानंतर सत्ताधारी महायुतीमधील साखर कारखानदारांची नाराजी दूर करण्यासाठी राष्ट्रीय सहकार विकास निगमच्या माध्यमातून १३ कारखान्यांच्या १८९८ दिलेले आश्वासन पाळले नाही असा मुद्दा उपस्थित करीत महायुतीतील काही नेत्यांनी विरोधकांच्या कारखान्यांना मंजूर झालेले कर्ज वितरित करण्यास विरोध दर्शविला आहे. त्यामुळे या १३ कारखान्यांतून सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे ( कोपरगाव) १२५ कोटी आणि कॉंग्रेसचे भोरचे आमदार संग्राम थोपटे यांच्या राजगड साखर कारखान्यास मंजूर झालेले ८० कोटी रुपयांचे कर्ज रोखण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून नव्याने चार कारखान्यांना शासनहमीवर कर्ज मिळवून देण्याचा प्रस्ताव राष्ट्रीय सहकार विकास निगमकडे पाठविला आहे.

# जात पडताळणीच्या नव्या निर्णयामुळे विद्यार्थी व पालक संभ्रमात; एसईबीसीअंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणारे विद्यार्थी गोंधळात

■ मुंबई : राकेश गायकवाड

अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सहा महिन्यांपर्यंत मुदत देण्याचा निर्णय सरकारने जाहीर असला तरी २२ जुलै रोजी राज्य सरकारने काढलेल्या शासन निर्णयाच्या प्रस्तावनेत असलेला सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा (एसईबीसी) उल्लेख निर्णयात नाही. त्यामुळे ही मुदत फक्त एसईबीसी प्रवर्गासाठी आहे की अन्य प्रवर्गासाठीही आहे, याबाबत संदिग्धता असल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. एसईबीसी अधिनियमाचा फायदा घेऊन शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे एसईबीसीतील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ मिळण्याची मागणी करण्यात येत होती. या मागणीचा सकारात्मक विचार करुन जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्याच्या सहा महिन्यापर्यंत प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला आहे. त्यानुसार राज्य सरकारने २२ जुलै रोजी काढलेल्या शासन निर्णयाच्या प्रस्तावनेत एसईबीसी प्रवर्गाचा उल्लेख



असला तरी निर्णयात एसईबीसी प्रवर्गाला जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ दिल्याचा कोणताही उल्लेख नाही.

व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी अर्ज नोंदणी करताना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागते. त्यामुळे राज्य सरकारच्या निर्णयानंतर विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून काही अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्ज नोंदणीसाठी मुदतवाढ दिली आहे. मात्र जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज केलेल्या पावतीच्या आधारे अर्ज स्वीकारले जातील का? याबाबतही शासन निर्णयामध्ये कोणतीही स्पष्टता नाही. त्यामुळे प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेल्या पावतीच्या आधारे अर्ज भरता येणार का? याबाबतही विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

**सेतू केंद्रावर अद्याप सुविधा नाही**

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एसईबीसी प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र मागण्यात आले आहे. मात्र जात पडताळणी प्रमाणपत्र देणाऱ्या सेतू केंद्रावर एसईबीसी प्रवर्गासाठी प्रमाणपत्र देण्याची सुविधाच उपलब्ध नाही. त्यामुळे सेतू केंद्रावर अर्ज स्वीकारले जात नाहीत. परिणामी जात वैधता प्रमाणपत्र कसे आणावे असा प्रश्न विद्यार्थी व पालकांसमोर उभा राहिला आहे.

# निवडणुकीचे वर्ष आहे; शालेय गुणवत्तेत सुधारणा दाखवा! भाजप आमदाराची मागणी, मुख्यमंत्र्यांचे आदेश अन् अधिकाऱ्यांची पळापळ

■ मुंबई : विशाल कारंडे

निवडणुकीचे वर्ष असल्याने शालेय शिक्षणाची गुणवत्ता वाढवायला हवी असा साक्षात्कार भाजपच्या एका आमदारांना झाला, त्यांनी तात्काळ काही शैक्षणिक आराखडा राबवण्याची सूचना देणारे पत्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिले. मुख्यमंत्र्यांनी त्याची दखल घेऊन तातडीने बैठक आयोजित करण्याचे आदेश शिक्षण विभागाला दिले आणि अधिकाऱ्यांची धांदल उडाली.



पूर्वीच्या कॉंग्रेस आघाडी शासनाच्या काळात प्रायोगिक तत्वावरील व्ही. रामाणी प्रारूप (पॅटर्न) राबवण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गुरूवारी बैठक घेणार आहेत. अभ्यासक्रम आराखडा, पुस्तकांचा दर्जा, गणवेशांचा वेळेवर न झालेला पुरवठा यामुळे सातत्याने टीकेचा धनी ठरलेल्या शालेय शिक्षण विभागाचा कारभार सुधारायला हवा याची जाणीव निवडणुकीचे वर्ष असल्यामुळे राज्यातील एका आमदारांना झाली. पूर्वाश्रमीच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या आणि काही वर्षांपूर्वी भाजपत स्थिरावलेल्या या आमदार महोदयांनी काय केले म्हणजे गुणवत्ता सुधारेल? याचा ध्यास घेऊन शैक्षणिक आराखड्यांची शोधाशोध सुरू केली.

# अंगणवाडी मुलांच्या पोषण आहार खर्चात आठ वर्षात वाढ नाही!

■ मुंबई : सम्यक कासारे

**देशभरातील कोट्यवधी बालकांना अंगणवाड्यांमधून मिळणार्या पोषण आहाराच्या खर्चात गेल्या आठ वर्षात वाढ करण्यात आलेली नाही तसेच अंगणवाडी सेविकांच्या मानधनातही गेल्या सहा वर्षात वाढ झालेली नसल्याने जिल्ह्या जिल्ह्यात केंद्रीय अर्थसंकल्पाची होळी करण्याचा निर्णय अखिल भारतीय अंगणवाडी सेविकांच्या संघटनेने घेतला आहे.**

संपूर्ण देशात ० ते ६ वयोगटातील बालकांच्या पोषण आहार व विकासाच्या दृष्टीने ऐकूण १३ लाख ९६ हजार अंगणवाड्या आहेत. या अंगणवाड्यांमधून कोट्यवधी बालकांना पोषण आहार देण्यात येत असतो. यात पुरेशी पोषक तत्वे असलेला आहार देणे अपेक्षित असून यात खिचडी तसेच वेगवेगळ्या पदार्थांचा समावेश आहे. हा आहार देता यावा यासाठी २०१३ मध्ये केंद्र सरकारने प्रति लाभार्थी ६ रुपयांवरून ७ रुपये ९२ पैसे अशी वाढ केली होती. त्यानंतर २०१७ साली यात ८ पैसे वाढ करून प्रति लाभार्थी ८ रुपये खर्च दिला जाऊ लागला. मागील ७ वर्षात यात कोणतीही वाढ करण्यात आली नसून केंद्रीय मंत्री तसेच या आहाराचे दर ठरविणार्या अधिकार्यांनी एवढ्या पैशात पुरेसे पोषण असलेला आहार तयार करून दाखवावा, असे आव्हान 'अखिल भारतीय अंगणवाडी सेविका व मदतनीस फेडरेशन'च्या उपाध्यक्ष व



'महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटने'च्या अध्यक्षा शुभा शमीम यांनी दिले आहे.

देशभरातील अंगणवाड्यांमधील कुपोषित व तीव्र कुपोषित बालकांची नियमित तपासणी होत असते. याबाबतची सर्व आकडेवारी केंद्र तसेच संबंधित राज्य सरकारांकडे असते. या बालकांना पुरेसा पोषण आहार मिळाला नाही तर त्यांची शारिरीक व मानसिक वाढ खुंटून भविष्यात त्यांच्या आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात. याची जाणीव असूनही केंद्रीय अर्थसंकल्पात या बालकांच्या पोषण आहारावरील खर्चात तसेच त्यांची व्यवस्थित काळजी घेणार्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांच्या मानधनात मागील अनेक वर्षात योग्य वाढ करण्यात आलेली नाही असे अंगणवाडी कर्मचारी कृती समितीचे अध्यक्ष एम. ए. पाटील यांनी सांगितले. महाराष्ट्रात एक लाख तीन हजार अंगणवाडी असून सुमारे दोन लाख अंगणवाडी सेविका ० ते ६ वयोगटातील ६० लाखाहून अधिक बालकांना पोषण आहार देण्यापासून आरोग्याची काळजी घेत असतात. २०१४ पूर्वी निवडणूक काळात तत्कालीन भाजप नेते देवेंद्र फडणवीस व सुधीर मुनगंटीवार यांनी अंगणवाडी सेविकांना २० हजार मानधन देण्याची भूमिका घेतली होती. मात्र सत्तेत आल्यानंतर ती कधीही पूर्ण केली नाही, असेही एम. ए. पाटील म्हणाले. देशपातळीवरील लाखो अंगणवाड्यातील बालके व अंगणवाडी सेविका या कायमच उपेक्षित राहिल्याचेही ते म्हणाले. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी सादर केलेल्या २०२४-२५च्या अर्थसंकल्पात सक्षम अंगणवाडी व पोषण २ या शिर्षकात मागील वर्षीच्या २१,५२३ हजार कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीच्या तुलनेत वाढलेल्या महागाईच्या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पात तरतूद वढविण्याऐवजी ३२३ कोटींची कपात करून फक्त २१,२०० हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याचे शुभा शमीम यांनी सांगितले.

# पिंपरी चिंचवड आयुक्तांची ३ गुन्हेगारी टोळयांमधील १३ गुन्हेगारांवर मोका अंतर्गत कारवाई

■ पिंपरी : विशेष प्रतिनिधी

हिंजवडी परिसरातील पगार टोळी, भोसरी परिसरातील दळवी टोळी आणि पिंपरी परिसरातील काळे टोळी या तीन गुन्हेगारी टोळ्यांवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये (मोका) कारवाई करण्यात आली आहे. चालू वर्षात शहरातील २५ संघटित गुन्हेगारी टोळ्यांमधील एकूण १४८ गुन्हेगारांवर मोकाअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. हिंजवडी परिसरातील टोळी प्रमुख सचिन साहेबराव पगार (वय ३१, रा. नाशिक), दिपक भगवान जाधव (वय २६, रा. चाकण पुणे. मुळ रा. मु.पो. पाथरी, ता.जि. जळगाव), योगेश शिवाजी दाभाडे या टोळीवर कारवाई करण्यात आली आहे. टोळीप्रमुख आणि त्याच्या साथीदारांवर एकूण दहा गुन्हे दाखल आहेत. भोसरी परिसरातील टोळीप्रमुख ओमकार मल्हारी दळवी (वय २२, रा. दिघी पुणे), योगेश जगन्नाथ मुळे (वय २१, रा. चक्रपाणी वसाहत, भोसरी पुणे), गणेश कृष्णा गवारी (वय १९, रा. चक्रपाणी वसाहत, भोसरी पुणे), विजय विरेंद्र चव्हाण (वय १९, रा. सदगुरुनगर, भोसरी पुणे), सचिन ऊर्फ पिरप्पा जगन्नाथ येरे (वय २०, रा. थावडे वस्ती, भोसरी पुणे), तेजस चंद्रकांत डोंगरे (वय २२, रा. थावडे वस्ती, भोसरी पुणे) या टोळीवर कारवाई करण्यात आली आहे. टोळीप्रमुख आणि त्याच्या साथीदारांवर सात गुन्हे दाखल आहेत.पिंपरी परिसरातील टोळीप्रमुख सुप्रिम राजु काळे (वय २४, रा. शंकरनगर, चिंचवड, पुणे), अविनाश सुभाष पात्रे (वय १९, रा. शंकरनगर, चिंचवड, पुणे), विनायक दयानंद क्षिरसागर (वय २०, रा. शंकरनगर, चिंचवड, पुणे), सुरेश काटे (रा. शंकरनगर, चिंचवड) या टोळीवर कारवाई करण्यात आली आहे. या टोळीवर सात गुन्हे दाखल




आहेत.वरील तीनही टोळी प्रमुख यांनी त्यांचे साथीदारांसह अन्य सदस्यांसाठी प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेऊन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन अवैध मार्गाने आर्थिक फायदा मिळवण्याचे उद्देशाने स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी गुन्हे केले आहेत. आरोपींनी हिंजवडी, भोसरी, एमआयडीसी भोसरी, महाळुंगे एमआयडीसी, पिंपरी, निगडी, गंगापुर, म्हसरुळ पोलीस स्टेशन हद्दीत खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, जबरी चोरी, दरोडा घालणे, पळवून नेऊन जबरी चोरी, घरफोडी, चोरी, वाहनाची तोडफोड करणे, सदोष मनुष्य वधाचा प्रयत्न करणे, बेकायदकशीर अग्निशस्त्रे व जिवघेणे हत्यारे जवळ बाळगणे, घातक शस्त्रे जवळ बाळगणे अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे चढत्या क्रमाने गुन्हे केले आहेत. या तीन तोळ्यांवर मोकांतर्गत कारवाईचे आदेश अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी यांनी दिले आहेत. ही कामगिरी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पोलीस सह आयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त बापु बांगर, पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे, सहायक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदशनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हेया थोरात, नितीन फटांगरे, अशोक कडलक, पोलीस निरीक्षक अनिल देवडे, उपनिरीक्षक श्री केंद्रे, पोलीस अंमलदार उभे, ओंकार बंड, कौटेकर, सचिन चव्हाण, व्यंकप्पा कारभारी यांच्या पथकाने केली आहे.